। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २७२ वा । मंगळवार दिनांक १३ जानेवारी, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### जुगार विरोधी कारवाई

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान ढोकी पोलीसांनी दि.१०.०१.२०२६ रोजी ढोकी पो ठाणे हद्दीत २ ठिकाणी छापे टाकले. यावेळी जावेद वय ४२ वर्षे, रा. क.तडवळे ता. जि. धाराशिव तिर्थराज हे बाजारपेठ क. तडवळे येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण १,१३० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले ढोकी पो. ठाणेच्या पथकास आढळले. तर फरीद वय ४६ वर्षे, रा. इंदीरा नगर गोवंडी मुंबई ह.मु. कसबे तडवळे,महेश यादव हे १७.०५ वा. सु.बसस्थानक जवळ चिंचेच्या झाडाखाली क. तडवळे येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ७३० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले ढोकी पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये ढोकी पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### मुऱ्हा म्हैस, तुरीचे पोते, गॅसची शेगडी, गॅस सिलेंडरची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुरेंद्र फत्तेसिंग ठाकुर, वय ३६ वर्षे, रा.वांगदरी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे वागदरी शिवारातील शेतात व शिक्षा जेठीथोर यांचे शेतातील गोडावून मधून मुऱ्हा म्हैस, तुरीचे ७ पोते, गॅसची शेगडी, भारत गॅस सिलेंडर, असे एकुण ६८,००० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुरेंद्रसिंग ठाकुर यांनी दि.०८.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### गंभीर जखमी होवून उपचार दरम्यान मयत

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत मयत विश्रांत दगडु गायकवाड, वय ८० वर्षे, रा. समाजमंदीराजवळ भिमनगर धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि.२६.११.२०२५ रोजी पायी जात होते. दरम्यान लेडीज क्लब बजरंगदल पाटी जवळ अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे हायगयी व निष्काळजीपणे चालवून विश्रांत गायकवाड यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात विश्रांत गायकवाड हे गंभीर जखमी होवून उपचार दरम्यान मयत झाले. नमुद अज्ञात वाहन चालक हा अपघाताची खबर न देता निघून गेला. फिर्यादी नामे-विजयनंद उर्फ विजय विश्रांत गायकवाड, वय ५० वर्षे, रा.समाजमंदीराचे बाजूला भिमनगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.१०.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम १०६,२८१,१२५(अ), १२५(ब) सह १८४, १३४ (अ)(ब) मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## दर्गाह उर्स मध्ये भाविकांचा वाढता प्रतिसाद:भाविक भक्तांनी लाभ घ्यावा



धाराशिव (प्रतिनिधी) - येथील हजरत ख्वाजा शमशुद्दीन गाझी (रहे) यांचा उरुस सुरू आहे. दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढत आहे. उरूस संपला असला तरी भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन या ठिकाणी करमणुकीची साधने असलेल्या विविध प्रकारच्या पाळणा व करमणूक व्यावसायिकांनी आपल्या नियमित तिकिट दरामध्ये थोडी थोडकी नव्हे तर चक्क ३० टक्क्यांची घसघशीत कपात केली आहे. त्यामुळे अनेकजण या करमणुकीच्या साधनाचा देखील मनमुराद आनंद घेत आहेत.

धाराशिव शहरातील हजरत ख्वाजा शमशुद्दीन गाझी (रहे) यांच्या उरूसाला मोठ्या भक्तिमय वातावरणात जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार उपस्थितीत व संदल मिरवणुकीने परंपरेनुसार प्रारंभ झाला. हा दर्गाह भारतातील तीन नंबरचा प्रसिद्ध दर्गाह म्हणून ओळखला जातो. त्यामुळे भाविक देशाच्या विविध भागातून दरवर्षी मोठ्या संख्येने दर्शनासाठी न चुकता येऊन आपली हजेरी लावतात. या उरूस दरम्यान धार्मिक कार्यक्रमाबरोबरच पाळणे व इतर मनोरंजन खेळ आणि विविध प्रकारच्या वस्तूंच्या विक्रीचे वेगवेगळे स्टॉल्स देखील लावले जातात. तसेच खवय्यांसाठी देखील वेगवेगळ्या प्रांतातील मात्र स्वादिष्ट, चविष्ट आणि रुचकर अशा प्रकारची मेजवानी या ठिकाणी दुकानदारांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेली असते. पवित्र उर्स दरम्यान विविध जाती-धर्माच्या मानकर यांना मान देण्यात आलेला आहे. त्यामुळे सर्व जाती-धर्माचे नागरिक हा उरूस मोठ्या उत्साहाने साजरा करतात. उरुस दरम्यान बहारदार कव्वाली गीतांचा कार्यक्रम देखील आयोजित केला जातो. नुकताच हा उरूस संपलेला आहे. मात्र, भाविकांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी असून आणखी तीन - चार दिवस या ठिकाणी हा भाविकांचा ओघ कायम राहणार आहे. भाविकांच्या वाढत्या गर्दीचा अंदाज घेऊन रिु पाळणा व इतर मनोरंजन करण्यासाठी आलेल्या दुकानदारांनी त्यांच्या नियमित तिकीट दरामध्ये ३० टक्क्यांनी कपात केलेली आहे. त्यामुळे या संधीचा लाभ सर्व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## मुरूमच्या उपनगराध्यक्षपदी रमेश चव्हाण यांची बिनविरोध निवड



मुरूम (प्रतिनिधी)- मुरुम पालिकेची पहिली विशेष सर्वसाधारणसभा शुक्रवारी (दि. ९) रोजी पालिकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या वेळी उपनगराध्यक्षपदी रमेश चव्हाण यांची तर भाजप गटनेतेपदी गणेश अंबर यांची निवड करण्यात आली.

मुरूम पालिकेत भाजपने २० पैकी १९ जागा मिळवून बहुमत प्राप्त केले असून, नगराध्यक्षपदी बापूराव पाटील हे बहुमताने विजयी झाले आहेत. उपनगराध्यक्ष निवडीसाठी शुक्रवारी नगराध्यक्ष बापूराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या सर्वसाधारण सभेचे आयोजन केले होते. या सभेत पालिकेच्या उपनगराध्यक्ष यांची निवड करण्यात आली. पालिकेतील भाजपचे गटनेते गणेश अंबर यांनी उपनगराध्यक्ष पदासाठी रमेश चव्हाण यांचा एकमेव अर्ज दाखल केल्याने पीठासीन अधिकारी तथा पालिकेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांनी रमेश चव्हाण यांची उपाध्यक्षपदासाठी बिनविरोध निवड जाहीर केली.उपाध्यक्ष निवडीनंतर नवनिर्वाचित नगराध्यक्ष बापूराव पाटील, युवा नेते शरण पाटील तसेच उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण यांचा भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, युवा नेते मल्हार पाटील, नितीन काळे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी सभापती मदन पाटील, उमरगा जनता बँकेचे संचालक रफिक तांबोळी, योगेश राठोड, चेअरमन दत्ता चटगे, प्राचार्य उल्हास घुरघुरे, गटनेते गणेश अंबर आदींसह नवनिर्वाचित नगरसेवक तसेच भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.बसवेश्वर चौकापासून पालिकेपर्यंत रांगोळी नगराध्यक्ष पदाचा औपचारिक पदभार स्वीकारल्यानंतर बापूराव पाटील यांचे पहिल्यांदा पालिकेत आगमन झाले. यानिमित्त बसवेश्वर चौकापासून पालिका कार्यालयापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा रांगोळी काढून पुष्पवृष्टीने नगराध्यक्ष व नगरसेवकांचे स्वागत करण्यात आले. या वेळी कार्यकर्त्यांनी घोषणा देत जल्लोषात स्वागत केले.

## मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समितीच्यावतीने नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेविकांचा सत्कार




धाराशिव (प्रतिनिधी)- मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समिती, धाराशिव यांच्या वतीने जिजाऊ जयंतीचा ४२९ वा वर्षोत्सव विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने धाराशिव नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा तसेच नगरसेविकांचा सत्कार शुक्रवार ९ जानेवारी रोजी कोट गल्ली येथील जंगम मठ येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुरेखा जगदाळे, सुरेखा जाधव, डॉ. वैशाली बलवंडे, ड. स्मिता कोल्हे, ड. अमिता देशमुख, सुनीता साळुंके उपस्थित होत्या.

यावेळी नगराध्यक्षा सौ. नेहा राहुल काकडे, नगरसेविका कुरेशी निसाबी मसूद, अलका प्रकाश पारवे, राणी दाजी आप्पा पवार, उबरे सोनाली अमित, गायत्री पृथ्वीराज दंडनाईक, आकांक्षा आकाश वाघमारे, आंबेकर रूपाली, राजकन्या संदीप पवार, दिपाली धनंजय पाटील, संगीता सदानंद अकोसकर, वैशालीताई रवी मुंडे, केशवबाई करवर, देवकते शकुंतला, सोनाली रविंद्र वाघमारे, ज्ञानेश्वरी निकम, पवार वंदना यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना समिती अध्यक्षा प्रणिता पंकज पाटील म्हणाल्या की, पुढील जिजाऊ जयंती जिजामाता उद्यानात भव्य स्वरूपात साजरी करण्यासाठी उद्यानाचा कायापालट करण्यात यावा. तसेच शहराच्या सर्वांगीण विकासासाठी जिजाऊंच्या लेकींनी राजकीय पक्षभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. नेहा राहुल काकडे म्हणल्या की शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध आहे. नागरिकांच्या अपेक्षां नुसार विकासकामे प्राधान्याने राबविण्याचा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष कमलताई नलावडे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात स्त्रीच्या भूमिकेवर मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रत्येक घरात स्त्रीने स्वतःला केवळ मम्मी न म्हणता आई म्हणून घ्यावे. छत्रपती शिवाजी महाराज जन्माला येत नसतात, तर त्यांना घडवावे लागते. जिजाऊं प्रमाणे प्रत्येक आईने आपल्या मुलाला संस्कारक्षम, धैर्यवान व समाजासाठी आदर्श ठरेल असा घडवावा, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमांना शहरातील अधिकाधिक महिला व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समिती अध्यक्षा प्रणिता पंकज पाटील यांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीच्या अध्यक्षा प्रणिता पंकज पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन अस्मिता बुरगुटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंदी पाटील यांनी केले.तसेच जन्मोत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## वयोवृद्ध शेत वस्तीवर राहणाऱ्या लोकांवर दरोडा घालणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड

धाराशिव (प्रतिनिधी)- दि ०७.०१.२०२६ रोजी रात्री कविता ज्ञानदेव कसबे रा. उपळा शिवार यांच्या शेत वस्तीवरील राहते घरी अज्ञातांनी घुसून त्यांना मारहाण करून सोन्याचे दागिने चोरी केले होते सदर बाबत पोस्टे धाराशिव ग्रामीण येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक रितू खोकर यांनी स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव यांना तात्काळ तपास करून नमूदचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेशित केले होते. दिनांक १०.१.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनी सुदर्शन कासार व पथक यांना माहिती मिळाल्यानुसार पथकाने मिळालेल्या माहितीनुसार मोहा, ता कळंब येथील पारधी पिढीवर छापा टाकून ०४ संशयित ताब्यात घेतले. नमूद व्यक्तींना विश्वासात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबूल केले. तसेच दिनांक १७.१२.२०२५ रोजी विमानतळ परिसर धाराशिव येथे दरोडा टाकला असल्याची तसेच, गोळेगाव ता वाशी, अंतरवली ता भूम या ठिकाणीही चोरी केली असल्याचे सांगितले. पोलिसांनी संबंधिताकडून नमूद गुन्ह्यातील १६.२ ग्रॅम वजनाचे दागिने जप्त केले आहेत. तसेच चोरीच्या ०४ मोटरसायकल जप्त करण्यात आल्या, शिर्डी व जामखेड येथील आहेत. अशाप्रकारे स्थानिक गुन्हे शाखेने दरोडा, जबरी चोरी आणि मोटरसायकल चोरीचे एकूण ०८ गुन्हे उघडकीस आणून त्यांच्याकडून एकूण ०२,०७,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्यामध्ये अनिल उर्फ लल्ल्या बादल शिंदे, छगन श्रीपती काळे, बिभीषण उर्फ बबड्या दिलीप काळे, विजय उर्फ तुंबड्या आप्पा पवार सर्व रा मोहा ता. कळंब जि धाराशिव अशी असून नमूदांकडून जप्त करून मुद्देमाल यांना पुढील कारवाई कामी पोस्ट धाराशिव ग्रामीण यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तसेच यातील व्यक्ती धाराशिव आणि बाहेर जिल्ह्यातील दरोडा जबरी चोरी सारख्या गुन्ह्यातील आरोपी असल्याची माहिती समोर आली आहे.

सदरची कामगिरी . पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली पोनि विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार,पोह. शौकत पठाण, पोह. जावेद काझी, पोह. प्रकाश औताडे,पोह.फरहान पठाण, मपोह. शोभा बांगर, चापोह. रत्नदीप डोंगरे, चापोह नवनाथ गुरव यांनी केली आहे.

## कस टिकवण्यासाठी सेंद्रिय शेती, पर्यावरणपूरक पद्धतीच अवलंबा-जिल्हा कृषी अधीक्षक मोरे

उमरगा शेतकऱ्यांनी कृषी विभाग व इतर शासकीय योजनांचा लाभ घेऊन शेतीचे उत्पन्न वाढवावे. हरभरा पिकाचे मार्गदर्शन करून सुधारित वाण, खत व्यवस्थापन व कीड नियंत्रणाबाबत शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले. जमिनीचा कस टिकवण्यासाठी सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून पर्यावरणपूरक पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन धाराशिव जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी राजकुमार मोरे यांनी केले. तालुक्यातील कलदेव निंबाळा ग्रामपंचायतीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. उपसरपंच सुनिता पावशेरे अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी ग्रामपंचायतच्यावतीने राजकुमार मोरे, तालुका कृषी अधिकारी ज्ञानोबा रितापुरे यांचा सुनीता पावशेरे, चेअरमन तुकाराम बिराजदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी तालुका कृषी अधिकारी रितापुरे यांनी पीएम किसान योजनेच्या लाभापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवून त्यांचे मानधन पूर्ववत मिळण्यासाठी योग्य ती कार्यवाही अन् सहकार्य करण्यात येईल, असे आवाहन केले. या वेळी ग्रामपंचायत अधिकारी सुनील पांचाळ, मंडळ कृषी अधिकारी एस. टी. शिंदे, उप कृषीअधिकारी एल. व्ही. फडणीस, सहायक कृषी अधिकारी रमेश पाटील, शेतकरी प्रभाकर बिराजदार, व्यंकट पाटील, चंद्रकांत कारभारी, शुभम नोगजा यासह शेतकरी अन् ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामपंचायत अधिकारी पांचाळ यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देण्यात आली.

ठिबक, तुषार सिंचनाचा वापर करून उत्पन्न वाढवावे, खतांची मात्राही योग्य मिळते... जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी मोरे म्हणाले, शेतकऱ्यांनी कांदा, फळबागा आदींवर अधिक भर द्यावा, ठिबक अन् तुषार सिंचन वापर करून उत्पन्न वाढवावे. पाण्याची बचत होऊन उत्पादनातही मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते. खतांची मात्रा देण्यासाठी ठिबक सिंचन ही पद्धत उपयोगी पडते. त्यामुळे आधुनिक पद्धतींचा अवलंब करावा.

देवीदास पावशेरे यांनी प्रास्ताविकात शेतकऱ्यांच्या समस्या, वातावरण बदलाने रब्बी पिकांवरती कीड रोगाचा प्रादुर्भाव झाला. खरिपावेळी तुरीचे अल्प उत्पादन मिळाले. वातावरण बदलाचा रब्बी हंगामातील पिकांना फटका बसला.

## सिकई राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेमध्ये ८ पदके

## धाराशिव जिल्ह्यातील तीन सुवर्ण, चार रौप्य व एक कांस्यपदक



उमरगा (प्रतिनिधी)-हैदराबाद येथील जीएमसी बाला योगी गॅचिंबोवली इनडोअर स्टेडियम येथे आयोजित २६ वी सिकई राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेचे आयोजन ५ ते ७ जानेवारीदरम्यान संपन्न झाला. या स्पर्धेत २२ राज्यासह देशभरातून ८०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. सिकई राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेत विविध वयोगटातील खेळाडू उपस्थित होते. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करताना जिल्हा धाराशिवमधील खेळाडूंनी मिक्स एरोसिकई स्पर्धेत १८ वर्षांखालील गटातून श्रेया जितेंद्र अंकुश, साई ज्ञानेश्वर माणिकवार, यश सुजित शिंदे या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळी करत अव्वल क्रमांकाचे यश मिळवून सुवर्णपदक पटकावून सुवर्ण कामगिरी केली. १८ वर्षांवरील वयोगटात क्रीडा प्रकार खवण के-१ यात अभय युवराज मोरे यांनी सहभाग नोंदवला. ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंनी १८ वर्षाखालील मुले क्रीडा प्रकार खवण के-१ या क्रीडा प्रकारात शहादा खान याने रौप्यपदक पटकावले. तर १८ वर्षांवरील वयोगटात मुलांनी क्रीडा प्रकार एरोसिकई ग्रुप या स्पर्धेत शुभम नकाते, सौरभ भगत, प्रथमेश केठवाढ या खेळाडूंनी या खेळाचे सादरीकरण करून रौप्यपदक मिळवले. १८ वर्षांखालील वयोगटातून मुलांमध्ये लोबा या क्रीडा प्रकारात ४८ किलो वजन गटातून यश शिंदे यांनी कांस्य पदक पटकावून महाराष्ट्राला पदक तालिकेत बहुमान मिळवून दिला.

या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पंच महंमदरफी शेख यांचे मिळाले. या स्पर्धेत इम्तियाज खान यांनी राष्ट्रीय पंच म्हणून काम पाहिले. महाराष्ट्र अध्यक्ष मजहर खान, सचिव रवींद्र गायकी यांनी पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धे साठी सर्व यशस्वी खेळाडूंना शुभेच्छा देवून अभिनंदन केले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

लातूर समाचार

## प्रचार शिगेला पोंहचला..

महानगरपालिका निवडणुक मतदानाची तारीख जवळ येत आहे तसे प्रचारात वेग घेतला आहे. सर्वच पक्ष आता प्रचाराने पेटून उठले आहेत. नाही ते मुद्दे भाषणात व्यक्त केले जात आहेत. चाडेचार वर्ष शांत असणारी मंडळी सभा घेवुन सनसनाटी मुद्दे मांडत आहेत. त्यामुळे मतदार नागरिकांच्या डोक्यात आता विचार भ्रमण करीत आहेत. नेतेगण सुंदर मुद्दे, विकासाचे मुद्दे आज मांडत आहेत. हेच मुद्दे महानगरपालिका ताब्यात असताना का मांडले नाहीत किंवा कामे का केली नाहीत. रस्ते, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, स्वच्छता मागील वर्षात करता आली असती. बहुतांशी उमेदवार हे माजी नगरसेवक आहेत. त्यांना समस्या सोडविता आल्या असत्या मात्र समस्या सोडविता न आल्याने आता पुन्हा तेच मुद्दे देवुन समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले जात आहेत. महानगरपालिकाचे क्षेत्र मोठे असते. समस्या ह्या काही तासात किंवा महिण्यात सोडविता येत नाहीत तर अनेक वर्ष लागतात. पिण्याचे पाणी आणायाचे म्हटले तर वेळ लागतो. भुयारी गटारी, ड्रेनेजची सिस्टीम या कामास वेळ लागतो. असे काम करण्याचे आता करण्याचे आश्वासन दिल्यास पुन्हा करतील का नाही याचा भरोसा नाही. प्रत्येक जन आश्वासन देत आहे. आम्ही हे करणार ते करणार असे सांगत असले तरी प्रत्यक्षात कामे कोण करणारा आहे याचा विचार करून मतदान केले पाहिजे. वास्तविक जवळपास सर्वच महानगरपालिकेत समस्या सारख्याच आहेत. एक सामुहिक उपायोजना करण्याची गरज आहे. मुळात आपल्या राज्यात महानगरपालिकेस अनुदान बऱ्यापैकी मिळते, त्यानुसार काम होणे अपेक्षित आहेत. ती होत नाहीत. सर्वात मोठे दुर्दैव म्हणजे कामे ही दर्जेदार होताना दिसून येत नाहीत. यासाठी नागरिकास जबाबदार धरले पाहिजे, कारण नागरिकांनीच दर्जेदार कामे करून घेतली पाहिजेत. त्यामुळे महागनरपालिकेच्या वाढीव हाद्दीत समस्या ह्या त्याच-त्या आहेत. तेही वर्षानुवर्षे आहेत. त्या सोडविल्याचा प्रयत्न सतत झाला पाहिजे. प्रचारातील भाषणे एकल्यावर दरवेळीची तीच ती टेप दिसून येत आहे. आता तर सोशल मिडीयाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. सोशल मिडीया उघडला की, आश्वासनाची खैरात बरोबर भाषणबाजी दिसून येत आहे. यावेळी महिला उमेदवारांची संख्या बरी आहे. मुस्लीमसमाजाचे उमेदवार यावेळी बऱ्या प्रमाणात उभी असल्याचे दिसून येत आहेत. वास्तविक मतदार नागरिकांनी विचारपुर्वक मतदान करण्याची वेळ आली आहे. पुर्वी पक्ष पाहुन मतदान होत होते. ही चालत आलेली परंपरा होती. आता शिक्षणाच्या वाढते प्रमाणामुळे मतदार जागृत दिसून येत आहे. एक बाब लक्षात येते मोठी मंडळी, नामदार असणारी, मोठा प्रस्त असणारी मंडळी जसे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिवसनेचे व मनसेचे नेते पेटून उठले आहेत. राज्यात सर्वात महत्त्वाची महानगरपालिका ही मुंबईची समजली जाते. ही आपल्या ताब्यात येण्यासाठी ठाकरे बंधू मोठा प्रयत्न करीत आहेत. मराठी माणसाची आस्मिता जागृत करीत आहेत. तसे मुंबईत मराठी माणसाचा टक्का कमी होत असताना कोणी लक्ष दिले नाही. गिरणी कामगाराकडे लक्ष दिले नाही. मराठी माणसावर होणारा अन्याय हिंदुहृदसम्राट बाळासाहेब ठाकरे जसे दूर करीत असत तसा प्रयत्न त्यांच्यानंतर होणे अपेक्षित असताना दुर्लक्ष झाले आहे हे मान्यच केले पाहिजे. राज्यात सर्वच नेत्याचे लक्ष मुंबई महानगरपालिकाकडे लागून आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ठाकरे परिवाराचे लक्ष मुंबई महागनरपालिकेडे लागून आहे हे सहज लक्षात येते. जशी मतदानाची तारीख जवळ येत आहे तसा प्रचारात वेग येत आहे. प्रचारात विविध मुद्दे तेही आश्वासने दिली जात आहेत. नाही हा शब्द बोलण्यात दिसून येत नाही. मुळात राजकिय नेत्यांनी किमान समस्या सोडविल्या असत्यातर आज एवढी मेहनत घेण्याची गरज भासली नसती. उलट नागरिक मतदार बिनविरोध प्रभागतील उमेदवार निवडले असते. निवडणुका ह्या आटीतटीच्या का होत आहेत. सर्व शक्ती लावली जात आहे. नाना प्रकार पहावयास मिळत आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रचारात जेवढी काही उपायोजना करात येईल त्याचा उपयोग करून घेतला जात आहे. कसर कोणतीही सोडली जात नाही. मुळात एका-एका प्रभागातून चार जणास निवडूण द्यावयाचे आहे. अ,ब,क व ड असे विभाग असून चार जणास मत द्यावयाचे आहे. त्यामुळे उमेदवारापेक्षा मतदाराची कसोटी येथेच लागणार आहे. मतदारांनी जर विचारपुर्वक मतदान केले तरच आगामी काळात एक चांगली महागनरपालिका म्हणून नावाजल्याशिवाय राहाणार नाही. मतदारांनी सोसल मिडीयावर जे चालले आहे ते पहावे, विचार करावा. नंतर आपल्या मनात जे आहे ते करण्याचा प्रयत्न करावा. वर-वर विचार करून चालणार नाही. तर आगामी पाच वर्ष सेवक म्हणून काम करणारा उमेदवार हवा आहे, तोच निवडला पाहिजे. लातूर शहराचा वाढता भाग, पाहाता वाढीव भागाचा विकासाचा आरखडा वेगळा तयार करावा लागणार आहे. शहरातील समस्या व वाढीव हद्दीतील समस्या सोडविण्याचे नियोजन भावी नगरसेवकांना करावे लागणार आहे. काम मोठे आहे. त्यामुळे जागृत नगरसेवकांची गरज आहे. लातूरात तर प्रचाराचा धुमाकुळ घातला आहे. प्रत्येकाला विजयाची खात्री वाटत असली तरी प्रत्यक्षात निवडणुक निकालानंतर कळणार आहे. सध्याला मतदारनागरिकांच्या मनात काय आहे हे कळणे आवघड दिसून येत आहे. कारण मतदार आता हुशार बनला आहे. आपल्या मनात काय आहे हे कळू देत नाहीत मात्र मनात जे आहे तेच करणारा आहे. त्यामुळे सोशल मिडीयावर जे चालले आहे. ते केवळ पाहाणे व विचारपुर्वक मतदान करणे बाकी आहे. एकतर प्रभाग मोठे आहेत. चार उमेदवार निवडण्यासाठी वेळ आहे. त्यामुळे मतदार नागरिकांनी विचारपुर्वक मतदान करण्याची वेळ आली आहे. यावेळी मात्र प्रसिद्धीच्या जेवढया सुविधा आहेत. त्याचा वापर करताना दिसून येत आहेत. पुरेपूर फेसबुक, व्हाटस्अपचा उपयोग करून घेतला जात आहे. आता कसोटी ही मतदाराची आहे.

# त्याग आणि बलिदानाचे मूर्तिमंत रूप श्री गुरु तेग बहादूर साहिबजी



श्री. गुरु तेग बहादूरजी हे शीख समुदायाचे गुरु होते, ज्यांची शहादत केवळ एका धर्म किंवा समुदायापुरती मर्यादित नसून, संपूर्ण मानवतेसाठी त्याग, धैर्य आणि धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. जेव्हा एका आध्यात्मिक गुरूंनी अन्याय, अत्याचार आणि धार्मिक दडपशाहीसमोर झुकण्याऐवजी आपले शीश अर्पण केले; मात्र आपल्या तत्त्वांशी कोणतीही तडजोड केली नाही. त्यामुळे त्यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आपल्याला त्या ऐतिहासिक क्षणाची आठवण होणे साहजिकच आहे. नांदेड येथे होत असलेल्या २४ व २५ जानेवारी २०२६ विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी केवळ शीख समुदायातीलच नव्हे, तर भारतीय उपखंडाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक इतिहासातील एक महान विभूती आहेत. त्यांचे जीवन धैर्य, त्याग, करुणा आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या सर्वोच्च आदर्शांचे प्रतीक आहेत. त्यांचा जन्म इसवी सन १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. ते सहावे शीख गुरु, गुरु हरगोबिंद साहिबजी यांचे धाकटे पुत्र होते. बालपणापासूनच त्यांचा स्वभाव गंभीर, शांत आणि आत्मचिंतनशील होता. इतर मुले खेळात रमलेली असताना गुरु तेग बहादूर साहिबजी एकांतात बसून ईश्वरचिंतन व साधनेत आनंद अनुभवत असत. त्यामुळेच पुढे त्यांचे जीवन बाह्य वैभवापेक्षा अंतःशक्ती आणि नैतिक दृढतेचे उदाहरण ठरले.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजींनी बालपणी शस्त्र व शास्त्र या दोन्हींचे शिक्षण घेतले. युद्धकौशल्य, घोडेस्वारी आणि तलवारबाजी यात त्यांनी प्रावीण्य मिळवले; मात्र कधीही हिंसा किंवा सत्तेच्या लालसेकडे त्यांचे मन वळले नाही. धर्म व मानवतेच्या रक्षणासाठीच शस्त्रांचा उपयोग अर्थपूर्ण असतो, हे ते जाणून होते. तरुणपणी त्यांनी दीर्घकाळ ध्यान व तपस्येचे जीवन स्वीकारले. त्यांच्या या वैराग्य व त्यागामुळेच त्यांना 'त्याग मल' असेही म्हटले गेले. हा त्याग संसारापासून पलायन नव्हता, तर अन्यायापुढे कधीही न झुकणारी आत्मशक्ती निर्माण करण्याचा मार्ग होता.

इसवी सन १६६४ मध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी शिखांचे नववे गुरु झाले. त्या काळात भारतातील सामाजिक व धार्मिक वातावरण अत्यंत तणावपूर्ण होते. तत्कालिन शासकाच्या धोरणांमुळे धार्मिक असहिष्णूता वाढत होती. अनेक ठिकाणी जबरदस्तीने धर्मांतर, मंदिरांचा विध्वंस आणि धार्मिक आस्थांवर कठोर निर्बंध लादले जात होते. अशा परिस्थितीत श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचे गुरु-पद स्वीकारणे ही केवळ आध्यात्मिक जबाबदारी नव्हे, तर एक मोठे ऐतिहासिक आव्हान होते.

गुरु तेग बहादूर साहिबजींनी आपल्या गुरु-कालावधीत व्यापक प्रवास केला. पंजाबपासून बंगाल, बिहार, आसाम तसेच पूर्व भारतातील अनेक भागांत त्यांनी भ्रमण केले. या यात्रांचा उद्देश केवळ शीख पंथाचा विस्तार नव्हता, तर लोकांमध्ये निर्भयता, आत्मसन्मान आणि ईश्वरावरील खरी श्रद्धा जागवणे हाच होता. ईश्वर एकच आहे आणि सर्व मानव समान आहेत, हे ते शिकवत. जात, धर्माच्या पलीकडे जाऊन सत्य, करुणा आणि प्रेमाचा मार्ग स्वीकारणे हीच खरी भक्ती आहे, असा त्यांचा संदेश होता.

गुरु तेग बहादूरजींची वाणी अत्यंत गूढ व तात्त्विक आहे. त्यांच्या रचना गुरु ग्रंथ साहिबमध्ये संकलित असून त्यामध्ये जीवनाची नश्वरता, मायेची असारता आणि ईश्वरभक्तीचा सखोल संदेश आढळतो. सुख-दुःख, मान-अपमान, भय-लोभ यापलीकडे जो जातो, तोच खऱ्या अर्थाने मुक्त आहे, असे ते सांगतात. आजही त्यांची वाणी माणसाला अंतःकरणाने मजबूत बनण्याची आणि बाह्य परिस्थितींनी विचलित न होण्याची प्रेरणा देते.

गुरु तेग बहादूरजींचे सर्वात महान व ऐतिहासिक योगदान म्हणजे धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले त्यांचे सर्वोच्च बलिदान होय. काश्मीरमधील पंडितांवर जबरदस्तीने दुसरा धर्म स्वीकारण्याचा दबाव टाकला जात होता. आपली श्रद्धा, संस्कृती आणि जीवनपद्धती वाचवण्यासाठी ते व्याकुळ झाले होते. जेव्हा ते गुरु तेग बहादूर साहिबजींकडे गेले, तेव्हा गुरुजींनी ही वेदना केवळ एका समुदायाची समस्या मानली नाही, तर तिला संपूर्ण मानवतेच्या व धर्मस्वातंत्र्याच्या प्रश्नाशी जोडले.

कोणत्याही व्यक्तीला आपल्या श्रद्धेनुसार जगण्याचा अधिकार आहे आणि कोणतीही सत्ता हा अधिकार हिरावून घेऊ शकत नाही, असे श्री गुरु तेग बहादूरजींनी ठामपणे सांगितले. भीषण परिणामांची जाणीव असूनही त्यांनी काश्मिरी पंडितांच्या रक्षणाचा संकल्प केला. हा त्यांच्या जीवनातील सर्वात धैर्यशील आणि ऐतिहासिक निर्णय होता.

ही बाब तत्कालिन शासकांच्या दरबारापर्यंत पोहोचताच श्री गुरु तेग बहादूरजींना दिल्लीला बोलावण्यात आले. तत्कालिन शासकांचा धर्म स्वीकारल्यास त्यांचे प्राण वाचतील आणि मान-सन्मान व सुविधा मिळतील, असे सांगण्यात आले. पर्यायाने चमत्कार दाखवण्याची मागणीही करण्यात आली. मात्र गुरुजींनी दोन्ही प्रस्ताव नाकारले. धर्मांतर म्हणजे आत्म्याशी द्रोह, तर चमत्कार दाखवणे म्हणजे ईश्वराच्या नावाचा अपमान, असे त्यांचे मत होते. जीवनाची किंमत मोजावी लागली तरी सत्य आणि विवेकाचा मार्ग स्वीकारण्याचा त्यांनी निर्धार केला.

इसवी सन १६७५ मध्ये दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेग बहादूरजींना सार्वजनिकरीत्या शहीद करण्यात आले. त्यांच्या समोरच त्यांचे तीन परम शिष्य भाई मती दास, भाई सती दास आणि भाई दयाल दास यांचा अमानुष छळ करण्यात आला, तरीही गुरु तेग बहादूरजी ठाम राहिले. त्यांनी मृत्यू स्वीकारला; पण आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. भारतीय इतिहासात धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेले हे एक अद्वितीय व अनुपम बलिदान आहे.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजींच्या शहादतीचा दूरगामी परिणाम झाला. या बलिदानाने हे स्पष्ट केले की भारताची आत्मा सहिष्णुता, विविधता आणि धार्मिक स्वातंत्र्यात दडलेली आहे. त्यांचे पुत्र गुरु गोबिंद सिंहजींनी या शहादतीतून प्रेरणा घेऊन खालसा पंथाची स्थापना केली आणि अन्याय, अत्याचार व असत्याविरुद्ध संघटित संघर्षाचा मार्ग खुला केला. अशा प्रकारे गुरु तेग बहादूरजींचा त्याग येणाऱ्या पिढ्यांसाठी धैर्य आणि आत्मसन्मानाचा शाश्वत स्रोत ठरला.

श्री गुरु तेग बहादूरजींचे जीवन हेही शिकवते की खरा धर्म केवळ आपल्या अनुयायांच्या रक्षणापुरता मर्यादित नसतो. त्यांनी आपले प्राण शीखांसाठी नव्हे, तर हिंदू पंडितांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. यामुळे ते संकुचित धार्मिक सीमांपलीकडे जाऊन एक सार्वत्रिक मानवतावादी व्यक्तिमत्त्व ठरतात. मानवता संकटात असताना खरे संत व महापुरुष वैयक्तिक हितांपेक्षा समाजाच्या हितासाठी उभे राहतात, त्यांचे जीवन हा सक्षम पुरावा होय.

आजच्या काळात, जेव्हा जगातील अनेक भागांत धार्मिक असहिष्णुता, हिंसा आणि द्वेष वाढत आहेत, तेव्हा श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचा संदेश अधिकच सुसंगत ठरतो. भीतीसमोर झुकणे सोपे असते; पण सत्यासाठी उभे राहणे हेच खरे धैर्य आहे, हे त्यांचे जीवन शिकवते. आत्मबल आणि नैतिक दृढता कोणत्याही सत्तेपेक्षा अधिक शक्तिशाली असते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले.

इतिहास केवळ विजेत्यांनी नव्हे, तर सत्य, धर्म आणि मानवतेसाठी प्राण अर्पण करणाऱ्या शहीदांनी घडतो, हाच संदेश गुरु तेग बहादूरजींचे जीवन व बलिदानातून आपल्याला मिळतो. अंधःकारातही मानवतेला प्रकाशाचा मार्ग दाखवला. धर्माचे रक्षण तलवारीने नव्हे, तर धैर्य, करुणा आणि सत्यनिष्ठेने होते, त्यामुळे श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे नाव भारतीय उपखंडात सदैव अमर दीपसारखे प्रज्ज्वलित राहील...

**(डॉ. अमरजीत कौंके हे पंजाबी व हिंदी भाषेतील प्रख्यात लेखक असून त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत.)**
**संपर्क : ९८१४२३१६९८ पटियाला, पंजाब (गुरुद्वारा जन्मस्थान: शिरोमणी संत नामदेव, नरसी नामदेव, हिंगोली यांच्या सौजन्याने)**

# ऑफिसमध्ये बॉससोबत चांगले नाते ठेवायचाय फॉलो करा 'या' टिप्स

तुम्हाला ऑफिसचं राजकारण टाळायचे आहे आणि तुमच्या बॉससोबत चांगले नाते निर्माण करायचे असेल तर काही गोष्टी कटाक्षाने पाळायला हव्यात. कॉर्पोरेटमधील नोकरी ही ९ ते ६ पर्यंत मर्यादित नसते अनेकदा नोकरदार वर्ग कामासाठी अधिक वेळ देतो. अशावेळी बॉससोबतच नातं चांगलं असणं गरजेचे असते. अशा परिस्थितीत, जर तुम्हालाही तुमच्या बॉससोबत तुमचे नाते सुधारायचे असेल, तर तुम्ही काय करावे हे जाणून घ्या.



बॉसचे ऐका

बॉसला नेहमी वाटते की त्याच्या टीमच्या सदस्यांनी तो जे काही बोलतो त्याचे पालन करावे. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला तुमच्या बॉसला प्रभावित करायचे असेल, तर तुम्हाला तुमच्या बॉसच्या प्रत्येक गोष्टीचे पालन करावे लागेल. उदाहरणार्थ, जे काही काम तुम्हाला दिले जाते, ते तुम्ही त्या वेळी केले पाहिजे. तुमच्या बॉसला कामात निष्काळजीपणा आवडणार नाही. अशा परिस्थितीत तुम्ही तुमचे काम वेळेवर केले तर तुमचा बॉस तुमच्यावर खूश असू शकतो.

प्रोफेशनल पद्धतीने बोला

बॉसला प्रोफेशनल लोक खूप आवडतात. अशा परिस्थितीत केवळ व्यावसायिक कपडेच नाही तर बॉसशी बोलताना व्यावसायिक पद्धतीचा अवलंब करावा. यामुळे तुमचा बॉस तुमच्यावर खुश होऊ शकतो. तुमच्या बॉसला या छोट्या गोष्टी आवडू शकतात.

जबाबदाऱ्या पार पाडा

जर तुम्हाला तुमच्या बॉसला प्रभावित करायचे असेल तर फक्त बोलणे पुरेसे नाही. तुमच्यावर जी काही जबाबदारी आली आहे ती तुम्हाला पूर्ण करावी लागेल. तुम्ही वेळेवर ऑफिसला आलात आणि तुमची जबाबदारी चोख पार पाडली तर तुम चा बॉस स्वत: तुमच्याशी बोलायला येईल. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या सर्व जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडल्या पाहिजेत.

कामाची मांडणी

कामाची योग्य अशी मांडणी करा. तुमच्या बॉसला तुमच्या कामाची पद्धत आवडेल अशा पद्धतीने करा. काम १०० टक्के चोख करणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे कामाचं नियोजन आणि कामाचा उत्तम दर्जा ही दोन तुमच्या कामाची जमेची बाजू असणे अत्यंत आवश्यक आहे.

गॉसिपिंगमध्ये अडकू नका

ऑफिस म्हटलं की, गॉसिप हे आलेच. पण तुम्ही या सगळ्यात अडकू नका. कारण बॉसला या गोष्टी अजिबात आवडत नाही. तुम्ही कुणाच्याही मागे जे काही बोलता ते त्या व्यक्तीपर्यंत पोहोचते. अशावेळी गॉसिपिंगचा पार्ट होऊ नका.

वरील ५ गोष्टींचं तंतोतंत फॉलो केलं तर तुमचा ऑफिसमधील वावर अतिशय महत्त्वाचा राहिल. तसेच तुमचं आणि बॉसचं नातं चांगल होईल यात शंका नाही.

# हिवाळ्यात वाढतोय 'स्ट्रोक' चा धोका; विशेष काळजी घेण्याचा तज्ज्ञांनी दिला 'हा' सल्ला



जसे हिवाळ्यात श्वसन संसर्ग आणि हृदयरोग वाढतात, तसेच ब्रेन स्ट्रोकच्या प्रकरणांमध्येही मोठ्या संख्येने वाढ होते. तापमान कमी झाल्यामुळे शरीरात रक्त गोठण्याची शक्यता अधिक असते आणि शरीराच्या हालचालीवर त्याचा परिणाम होतो. अशा परिस्थितीत रक्तप्रवाह करणाऱ्या धमन्या आकुंचन पावतात आणि मेंदूपर्यंत पोहोचणाऱ्या रक्तप्रवाहाचा वेग मंदावतो. त्यामुळे हृदय आणि मेंदूला पुरेसे रक्त मिळत नाही. ऑक्सिजन आणि रक्ताच्या प्रवाहात अडथळा आल्याने रक्ताची गुठळी तयार होते आणि पक्षाघाताचा (ब्रेन स्ट्रोक) धोका वाढतो.

तापमानात घट झाल्याने उच्च रक्तदाब, रक्ताच्या गुठळ्या, निर्जलीकरण होणे अशा समस्या आढळून येतात. डॉक्टरांना, विशेषत: उच्च रक्तदाब, मधुमेह किंवा हृदयरोग असलेल्यांना, थंडीच्या काळात विशेष सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.

**ब्रेन स्ट्रोकचे दोन प्रकार**

ब्रेन स्ट्रोकचे दोन प्रकार असतात, पहिला म्हणजे इस्केमिक ब्रेन स्ट्रोक आहे. यामध्ये मेंदूच्या धमन्यांमध्ये रक्ताच्या गुठळ्या तयार झाल्याने रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होतो. यामुळे त्यामुळे मेंदूच्या पेशींना पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही आणि त्यामुळे या पेशी वेगाने नष्ट होऊ लागतात. दुसऱ्या स्थितीत रक्तस्त्रावाचा झटका येतो. यामध्ये मेंदूची रक्तवाहिनी फुटल्याने रक्तस्त्राव होऊन अतंर्गत भागात रक्त साचते. हिवाळ्यात स्ट्रोकच्या रुग्णांची संख्या वाढते कारण थंड हवामानामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, रक्तदाब वाढतो आणि रक्त गोठते. व्यायामाचा अभाव, डिहायड्रेशन आणि प्रदूषणामुळे याचा धोका अधिक वाढतो. हिवाळ्यातील डिहायड्रेशनकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. परंतु सौम्य डिहायड्रेशन देखील रक्ताच्या गुठळ्या निर्माण करू शकते, ज्यामुळे गोठण्याची शक्यता वाढते. फ्लू आणि न्यूमोनियासारख्या संसर्गामुळे रक्तवाहिन्यांना सूज येते. ज्यांना आधीच हृदयरोग, मधुमेह किंवा उच्च कोलेस्ट्रॉल आहे त्यांना स्ट्रोकचा धोका अधिक असतो. हिवाळ्यात ३० ते ६५ वयोगटातील लोकांमध्ये स्ट्रोकच्या प्रकरणांमध्ये १०म वाढ होते. जर कोणाला अचानक अशक्तपणा, चेहरा अचानक वाकडा होणे किंवा बोलताना त्रास होणे यासारखी सुरुवातीची लक्षणे दिसली तर त्यांनी ताबडतोब रुग्णालयात जावे, अशी प्रतिक्रिया नवी मुंबईतील न्यूईरा हॉस्पीटलचे न्यूरोसर्जन (मेंदू आणि मणका) डॉ. सुनील कुट्टी यांनी व्यक्त केली.

डॉ. सुनील कुट्टी पुढे सांगतात की, सीटी आणि एमआरआय स्कॅनसारख्या न्यूरोइमेजिंगमुळे डॉक्टरांना स्ट्रोकचा प्रकार आणि स्थान ओळखण्यास मदत होते, ज्यामुळे जलद आणि अचूक उपचार शक्य होतात. इस्केमिक स्ट्रोकमध्ये रक्त प्रवाह सुरू झाल्यानंतर काही तासांत दिला तर रक्तस्त्राव पुनर्संचयित करण्यासाठी विशेष औषधांचा वापर केला जातो. यामध्ये क्लॉट-बस्टिंग ड्रग्ज (टीपीए सारखी) वापरले जातात. उपचार करताना, स्ट्रोकच्या स्थितीनुसार, डॉक्टर सीटी स्कॅन, एमआरआय यांसारख्या चाचण्या करून घेतात. एखाद्या प्रकरणामध्ये रक्ताची गुठळी तयार झाली असेल तर, त्यावर औषधांनी उपचार करता येऊ शकतो. पण धमनी फुटल्यामुळे मेंदूच्या कोणत्याही भागात रक्ताच्या गुठळ्या झाल्या असतील तर शस्त्रक्रिया हाच पर्याय ठरतो. एंडोव्हस्कुलर थेरपी ही मिनीमली इन्व्हेसिव्ह प्रक्रिया, डॉक्टरांना कॅथेटर वापरून क्लॉट काढून टाकण्यास मदत करते. ब्रेन स्ट्रोकची लक्षणे जाणवल्यास रुग्णाला ताबडतोब रुग्णालयात नेणे अवश्यक असते. हा त्रास झाल्यावर पहिले तीन ते चार तास (गोल्डन अवर्स) हे उत्तम उपचारांसाठी अतिशय महत्वपूर्ण ठरतात.

**ब्रेन स्ट्रोकवर 'हा' उपाय फायदेशीर**

स्ट्रोक प्रतिबंधाकरिता त्याबाबत जागरूकता आणि नियमित आरोग्य तपासणीने गरजेची आहे. वेळोवेळी रक्तदाब तपासणे, सक्रिय जीवनशैली बाळगणे आणि हायड्रेशन राखणे यामुळे स्ट्रोकचा धोका कमी होतो. धूम्रपान टाळणे, मद्यपानाचे सेवन मर्यादित करणे आणि शरीराचे तापमान सामान्य राखण्यासाठी उबदार कपडे घालणे गरजेचे आहे.

ब्रेन स्ट्रोकची लक्षणे- हिवाळ्यात तापमानात घट झाल्याने रक्तवाहिन्या अरुंद होतात, ज्यामुळे रक्तदाब वाढतो आणि हृदयावर ताण येतो. बरेचजण हिवाळ्यात व्यायामाचा कंटाळा करतात, पाणी कमी पितात या सर्वामुळे रक्ताच्या गुठळ्या तयार होण्याचा धोका वाढतो. सांकेतिक भाषेत स्ट्रोकच्या लक्षणांचे वर्गीकरण हे बीफास्ट असेही करता येते. याचा अर्थ (बॅलेन्स - संतुलन कमी होणे, आईज- दृष्टी धूसर होणे किंवा कमी होणे, फेस- चेहऱ्याचा काही भाग क्षीण होणे, आर्म- हात कमकुवत होणे, स्पीच- बोलण्यात अडचणी आणि टाईम- वेळ). वरिल लक्षणं आढळल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्या. वेळीच उपचारान् अमुल्य जीव वाचू शकतो आणि अर्धांगवायू किंवा मृत्यूसारखे दीर्घकालीन अपंगत्व टाळता येते. गोल्डन अवरमध्ये (पहिल्या ६० मिनिटांत) रुग्णालयात पोहोचल्याने मृत्यूचा धोका टाळता येतो आणि दीर्घकालीन अपंगत्व टाळता येते. रक्ताच्या गुठळ्या दूर करण्यासाठी औषधं, थ्रोम्बेक्टॉमी आणि रिहॅबिलेशन यासारख्या उपचारांमुळे शारीरीक हालचाल आणि बोलताना येणारा अडथळा दूर करता येऊ शकतो. रक्तदाब नियंत्रणात ठेवून, शरीर सक्रिय राखुन तसेच निरोगी आहाराच्या सेवनाने स्ट्रोकचा धोका टाळता येतो. धूम्रपान टाळणे आणि नियमित आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. लक्षात ठेवा, जवळजवळ ८०म स्ट्रोक हा त्याबाबत असलेली जागरूकता आणि वेळीच वैद्यकीय उपचारान् रोखता येतो अशी प्रतिक्रिया इंडियन स्ट्रोक असोसिएशन (घएअ) चे सचिव, स्ट्रोक स्पेशलिस्ट आणि न्यूरोलॉजिस्ट डॉ. अरविंद शर्मा यांनी व्यक्त केली.

**- डॉ. सुनील कुट्टी नवी मुंबईतील न्यूईरा हॉस्पीटलचे न्यूरोसर्जन (मेंदू आणि मणका)**
**- डॉ. अरविंद शर्मा इंडियन स्ट्रोक असोसिएशन चे सचिव, स्ट्रोक स्पेशलिस्ट आणि न्यूरोलॉजिस्ट**

# सुंदर विठ्ठलाचे ध्यान : तुकोबांची जीवनदृष्टी



## अभंगवाणी

**विद्यावाचस्पती विद्यानंद**

**सुंदर ते ध्यान उभे विटेवरी,**
**कर कटावरी ठेवूनिया**
**तुळशीहार गळा कासे पीतांबर,**
**आवडे निरंतर हेंचि ध्यान**
**मकरकुंडले तळपती श्रवणीं,**
**कंठी कौस्तुभमणि विराजित**
**तुका म्हणे माझे हेंचि सर्व सुख,**
**पाहीन श्रीमुख आवडीने**

संत परंपरेत संत तुकाराम महाराजांचे स्थान केवळ भक्तीपर नाही; तर वैचारिक, सामाजिक आणि मानवी जाणिवांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या अभंग वाणीने महाराष्ट्राच्या लोकजीवनाला शतकानुशतके दिशा दिली आहे. तुकोबांचे अभंग हे केवळ देवाच्या स्तुतीसाठी रचलेले काव्य नाही; तर ते माणसाच्या अंतःकरणाशी थेट संवाद साधणारे जीवनतत्त्वज्ञान आहे. सुंदर ते ध्यान उभे विटेवरी या अभंगातून व्यक्त होणारे विठ्ठलाचे रूप हे भक्तीच्या भावनिक पातळीपुरते मर्यादित राहत नाही; तर ते समाज, नीतिमूल्ये आणि आत्मिक विकास यांचा समन्वय साधते. या अभंगांमधील शब्दरचना साधी असली; तरी त्यामागील अर्थ अत्यंत गूढ आणि व्यापक आहे.

तुकोबांच्या काळातील समाज हा जातिभेद, कर्मकांड, अन्याय आणि अज्ञानाने ग्रासलेला होता. अशा परिस्थितीत तुकोबांनी विठ्ठलाच्या माध्यमातून माणसाला माणसाशी जोडण्याचे कार्य केले. त्यांच्या दृष्टीने देव म्हणजे दूर कुठे असलेली शक्ती नव्हे; तर जीवनाच्या प्रत्येक क्षणात अनुभवता येणारी जाणीव होती.

या अभंगांतील विठ्ठलाचे ध्यान म्हणजे ध्यानधारणा नव्हे; तर जगण्याची पद्धत आहे. उभा विटेवरी असलेला विठ्ठल हा स्थैर्याचा, संयमाचा आणि समतेचा प्रतीक आहे. हात कटीवर ठेवून उभा असलेला देव हा अधिकाराने नव्हे; तर आत्मविश्वासाने उभा आहे. या प्रतिमेमधून तुकोबा सामान्य माणसाला सांगतात की आत्मसन्मान आणि नीतिमूल्यांवर उभे राहणे हेच खरे अध्यात्म आहे. तुळशीहार, पीतांबर, मकरकुंडले आणि कौस्तुभमणि ही अलंकारांची वर्णने केवळ सौंदर्यदर्शनासाठी नसून; ती शुद्धता, ज्ञान, संवेदनशीलता आणि सत्य यांची रूपके आहेत. त्यामुळे या अभंगांचे चिंतन करताना केवळ भक्तिभाव नव्हे; तर विचारांची खोली आणि सामाजिक भानही जागृत होते. वर्तमान काळात; जिथे माणूस बाह्य यश, भौतिक सुख आणि अस्थिर आनंदाच्या मागे धावत आहे; तिथे तुकोबांची ही अभंगवाणी अंतर्मुख होण्यास भाग पाडते. म्हणूनच या लेखामध्ये या अभंगांचा तात्त्विक, सामाजिक आणि आध्यात्मिक अर्थ उलगडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जेणेकरून वाचकाला केवळ अर्थ समजून घेता येईल असे नव्हे; तर त्या अर्थांचे प्रतिबिंब स्वतःच्या जीवनात पाहण्याची प्रेरणाही मिळेल.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीमध्ये जेव्हा सुंदर ते ध्यान उभे विटेवरी असे शब्द उमटतात; तेव्हा ते केवळ पंढरीतील विठ्ठलाच्या मूर्तीचे वर्णन करत नाहीत; तर मानवी जीवनाला दिशा देणार्या एका संपूर्ण तत्त्वज्ञानाचा आविष्कार करतात. तुकोबांसाठी विठ्ठल म्हणजे केवळ देवालयातील दगडी मूर्ती नव्हे; तर तो जीवनाचा अर्थ, जगण्याची पद्धत आणि माणसाच्या अंतरंगातील सत्य आहे. या अभंगामध्ये दर्शन, भक्ती, समाजबोध आणि आत्मिक उन्नती यांचे सुंदर एकत्रीकरण आढळते.

उभे विटेवरी ध्यान करताना तुकोबांच्या डोळ्यांसमोर जो विठ्ठल उभा आहे; तो स्थिर आहे, शांत आहे आणि सर्वांवर समान कृपा करणारा आहे. विटेवर उभे राहणे हे प्रतीक आहे. वीट म्हणजे अहंकार, चंचलता, स्वार्थ, लोभ यांचे प्रतीक मानले जाते. त्या विटेवर उभा असलेला विठ्ठल म्हणजे या सार्या दुर्गुणांवर पाय ठेवून उभा असलेला परमात्मा होय. तुकोबांना सांगायचे आहे की देव जीवनातील विकारांपासून दूर नाही, तर तो त्यांच्यावर नियंत्रण ठेवून उभा आहे. माणसानेही जीवन जगताना आपले अहंकार, राग, मत्सर यांच्यावर पाय ठेवूनच पुढे गेले पाहिजे. हे केवळ आध्यात्मिक नव्हे; तर सामाजिक तत्त्वज्ञानही आहे. कारण समाजातील संघर्षांचे मूळ हे मानवी विकारांतच दडलेले असते.

कर कटावरी ठेवूनिया या ओळीत विठ्ठलाची जी सहज मुद्रा आहे; ती फार बोलकी आहे. हात कटीवर ठेवून उभा असलेला देव म्हणजे अधिकार गाजवणारा नाही; तर आपल्या भक्तांकडे प्रेमाने, विश्वासाने पाहणारा सखा आहे. या मुद्रेत अधिकार नाही; तर आत्मविश्वास आहे. तुकोबांना वाटते की ईश्वर भक्ताच्या अगदी जवळ उभा आहे; तो दूर कुठे स्वर्गात नाही. ही संकल्पना तत्कालीन कर्मकांडप्रधान समाजव्यवस्थेला आव्हान देणारी होती. देवाला भेटण्यासाठी मोठे विधी, यज्ञ, खर्चिक पूजा यांची गरज नाही; निर्मळ भावना आणि सरळ अंतःकरण आवश्यक आहे. सामाजिकदृष्ट्या पाहता, हा विचार सर्वसामान्य माणसाला देवाच्या जवळ आणणारा आहे. जात, वर्ग, संपत्ती यांचे भेद दूर करणारा हा भक्तीचा मार्ग आहे.

तुळशीहार गळा कासे पीतांबर असे वर्णन करताना तुकोबांनी विठ्ठलाच्या अलंकारांमध्येही मोठा अर्थ दडवला आहे. तुळस ही पवित्रतेचे, साधेपणाचे आणि सात्त्विकतेचे प्रतीक आहे. गळ्यात तुळशीहार असलेला देव म्हणजे बाह्य वैभवापेक्षा अंतर्गत शुद्धतेला महत्त्व देणारा देव होय. पीतांबर हा तेजाचा, ज्ञानाचा रंग मानला जातो. येथे विठ्ठलाचा पोशाख ऐश्वर्य दाखवण्यासाठी नसून; तो चेतनेचा, आत्मप्रकाशाचा सूचक आहे. तुकोबांना असे सांगायचे आहे की जीवनात बाह्य चमकधमक नव्हे; तर अंतःकरणातील शुद्धता महत्त्वाची आहे. समाजातही जर तुळशीसारखी पवित्रता आणि पीतांबरासारखे ज्ञान रुजले, तर संघर्ष, अन्याय, शोषण यांना फारसा वाव उरणार नाही.

आवडे निरंतर हेंचि ध्यान या ओळीत तुकोबांची अखंड भक्ती व्यक्त होते. हे ध्यान केवळ डोळ्यांनी पाहण्याचे नाही; तर मनाने जगण्याचे आहे. विठ्ठलाचे रूप हे त्यांच्या जीवनाचा श्वास बनले आहे. येथे ध्यान म्हणजे पलायन नव्हे; तर वास्तवाशी अधिक प्रगल्भ पद्धतीने जोडले जाणे आहे. तुकोबांच्या भक्तीमध्ये निष्क्रियता नाही. ते संसारात राहून कष्ट करून, अन्यायाविरुद्ध आवाज उठवूनही विठ्ठलाचे ध्यान करतात. यामुळे भक्ती आणि सामाजिक जबाबदारी यांच्यातील दरी मिटते. आजच्या काळातही हा विचार महत्त्वाचा आहे. केवळ पूजा-पाठ करून समाजातील दुःखांकडे दुर्लक्ष करणे ही भक्ती नाही; तर त्या दुःखांवर उपाय शोधत ईश्वराचे स्मरण ठेवणे ही खरी भक्ती आहे.

मकरकुंडले तळपती श्रवणीं असे वर्णन करताना तुकोबा सौंदर्याच्या बाह्य अंगाकडे पाहतात; पण तेथेही एक सूक्ष्म अर्थ आहे. मकरकुंडले म्हणजे ऐकण्याची क्षमता होय. कानात झळकणारी कुंडले म्हणजे देव हा सतत ऐकणारा आहे, भक्ताच्या हाकेला प्रतिसाद देणारा आहे. तुकोबांच्या दृष्टीने ईश्वर हा मुकाट नाही, तो संवाद साधणारा आहे. माणसानेही समाजात राहून एकमेकांचे दुःख, वेदना ऐकल्या पाहिजेत. ऐकण्याची संवेदना नष्ट झाली की समाज कठोर बनतो.

तुकोबांचा विठ्ठल ऐकतो, म्हणून तो करुणामय आहे. कंठी कौस्तुभमणि विराजित ही ओळ आत्मज्ञानाच्या शिखराकडे नेणारी आहे. कौस्तुभमणि ही परम मूल्यांची, अमूल्य सत्याची खूण आहे. विठ्ठलाच्या कंठात असलेला हा मणी म्हणजे ज्ञान, विवेक आणि सत्य होय. तुकोबांना असे वाटते की देवाच्या जवळ असणे म्हणजे ज्ञानाच्या जवळ असणे. अंधश्रद्धा, अज्ञान, भीती यांना भक्तीत स्थान नाही. खरी भक्ती ही विवेकाला जागवते. समाजाला जर पुढे जायचे असेल; तर केवळ भावना नव्हे; तर समज, ज्ञान आणि प्रश्न विचारण्याची वृत्ती आवश्यक आहे. तुकोबांची भक्ती ही प्रश्न विचारणारी, आत्मपरीक्षण करणारी आहे.

तुका म्हणे माझे हेंचि सर्व सुख या शब्दांत तुकोबांनी जीवनसार सांगितले आहे. संपत्ती, मान, प्रतिष्ठा, सत्ता यामध्ये त्यांना सुख दिसत नाही. त्यांच्या सुखाचे केंद्र विठ्ठलाच्या ध्यानात आहे. हे सुख क्षणिक नाही; तर अंतःकरणात खोलवर रुजलेले आहे. तुकोबांचे जीवन पाहिले तर दारिद्र्य, उपेक्षा, अपमान यांचा सामना त्यांनी केला; तरी त्यांच्या लेखणीतील आनंद कमी झाला नाही. कारण त्यांच्या सुखाचा आधार बाह्य परिस्थिती नव्हता; तर अंतर्गत स्थैर्य होते. ही शिकवण आजच्या अस्थिर जगात फार महत्त्वाची आहे.

बाह्य यश-अपयशावर अवलंबून असलेले सुख टिकत नाही; पण मूल्यांवर आधारित सुख टिकून राहते. पाहीन श्रीमुख आवडीने या शेवटच्या ओळीत भक्तीचा उत्कट भाव आहे. श्रीमुख पाहणे म्हणजे केवळ देवाचे रूप पाहणे नव्हे; तर त्या करुणामय, समतेच्या, प्रेमाच्या तत्त्वांना आपल्या जीवनात पाहणे आहे. तुकोबांसाठी विठ्ठलाचे मुख म्हणजे न्याय, दया आणि सत्य यांचे प्रतिबिंब आहे. ते पाहताना त्यांना समाधान मिळते; कारण त्या मुखात त्यांना मानवतेचे अंतिम ध्येय दिसते.

या अभंगांमधून संत तुकाराम महाराजांनी एक समग्र जीवनदृष्टी दिली आहे. ती केवळ वैयक्तिक मोक्षापुरती मर्यादित नाही; तर सामाजिक समतेचा, नैतिक शुचिर्भूततेचा आणि आत्मिक उन्नतीचा मार्ग दाखवते. विठ्ठलाचे ध्यान हे त्यांच्या दृष्टीने पलायन नव्हे; तर परिवर्तनाची शक्ती आहे. माणसाने स्वतःत बदल घडवला, तर समाज बदलेल आणि समाज बदलला; तर जीवनात खरी शांती नांदेल; हा विश्वास या अभंगांतून प्रकट होतो.

म्हणूनच हे अभंग आजही जिवंत आहेत. कारण ते केवळ देवाविषयी बोलत नाहीत;तर माणूस कसा असावा, समाज कसा घडावा आणि जीवन कसे जगावे; याचे मार्गदर्शन करतात.

या संपूर्ण चिंतनाचे सार असे की, संत तुकाराम महाराजांचे विठ्ठलध्यान हे भक्ती आणि जीवन यांच्यातील दरी मिटवणारे आहे. त्यांनी मांडलेली भक्ती ही कर्मकांडात अडकलेली नसून; ती माणसाला अधिक जबाबदार, संवेदनशील आणि विवेकी बनवणारी आहे. तुकोबांसाठी विठ्ठल म्हणजे आनंदाचा स्रोत आहे; पण तो आनंद पलायनातून मिळणारा नाही. तो आनंद दुःख स्वीकारून, सत्याशी प्रामाणिक राहून आणि मूल्यांशी तडजोड न करता जगण्यातून मिळतो. माझे हेंचि सर्व सुख असे म्हणताना तुकोबा भौतिक सुखाला नाकारत नाहीत; पण त्याला अंतिम स्थान देत नाहीत. त्यांच्या दृष्टीने अंतिम सुख हे अंतःकरणातील शांततेत आहे; जी विठ्ठलाच्या स्मरणातून प्राप्त होते.

आजच्या सामाजिक परिस्थितीत जिथे असहिष्णुता, ताणतणाव आणि असमानता वाढत चालली आहे; तिथे तुकोबांचा हा संदेश अधिकच अर्थपूर्ण ठरतो. माणसाने दुसर्याचे ऐकणे, समजून घेणे, अन्यायाला विरोध करणे आणि तरीही अंतःकरणात करुणा जपणे; ही शिकवण त्यांच्या अभंगांमधून सातत्याने मिळते. विठ्ठलाचे श्रीमुख पाहण्याची तुकोबांची ओढ म्हणजे मानवी मूल्यांचे दर्शन घेण्याची ओढ आहे. त्या मुखात त्यांना प्रेम, दया आणि सत्य दिसते. या मूल्यांचे दर्शन जर प्रत्येकाने आपल्या जीवनात घेतले; तर समाज अधिक सुसंस्कृत आणि सुसंवादी होऊ शकतो. म्हणूनच या अभंगाचे चिंतन केवळ आध्यात्मिक समाधानासाठी नसून०१/११/२६; ते सामाजिक परिवर्तनाचे बीजही आहे. तुकोबांची अभंगवाणी आजही तितकीच जिवंत आहे. कारण ती काळाच्या मर्यादांपलीकडे जाऊन माणसाच्या मूलभूत प्रश्नांना उत्तर देण्याची क्षमता ठेवते.

# देवाभाऊ मुख्यमंत्री पदावर आहेत तोपर्यंत मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना कायम सुरूच राहणार -अजित पाटील कव्हेकर



**लातूर/प्रतिनिधी:** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्यापासून महाराष्ट्र राज्याचा चौफेर विकास करण्याचे काम सुरू आहे. देवाभाऊंनी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अनेक लोकाभिमुख योजना जाहीर केलेल्या आहेत. यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून प्रत्येक घरातून दोन महिलांना प्रत्येकी महिना १५०० रूपये आर्थिक मदत देऊन आधार देण्याचे काम सुरू आहे. तसेच निराधार महिलांना अडीच हजार रूपये पगार व मुलींना उच्चशिक्षण मोफत देऊन शिक्षणाच्या मुळ प्रवाहात ठेवण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. राज्यातील सर्व लाडक्या बहिणी देवाभाऊच्या कार्यावर समाधानी असताना राज्य सरकारने लाडक्या बहिणीसाठी सुरू केलेली मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना बंद करावी. अशा मागणीचे पत्र निवडणूक आयोगाला पाठवून लाडक्या बहिणीच्या पगारीला उघडपणे विरोध करण्याचे काम काँग्रेसकडून होत आहे. परंतु राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उर्फ देवाभाऊ राज्याच्या मुख्यमंत्री पदावर आहेत. तोपर्यंत मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना कायमस्वरूपी राहणार असल्याची घोषणा त्यांनी स्वतः लातूरमध्ये झालेल्या विजयी संकल्प सभेमध्ये केलेली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना कायमस्वरूपी सुरू राहणार असल्याचे भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी बोलताना सांगितले.

महाराष्ट्रामधील सर्व लाडक्या बहिणीबाबत काँग्रेसच्या मनामध्ये द्वेष भरलेला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना ही लोकाभिमुख योजना ठरली आहे. लाडकी बहिण योजनेचा लाभ बहुतांश सर्वच महिलांना मिळत असल्यामुळे त्यांच्या चेहर्यावरील आनंद द्विगुणीत झालेला आहे. नेमका हाच लाडक्या बहिणीच्या चेहर्यावरील आनंद काँग्रेस नेत्याला पाहवत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून लाडक्या बहिणीच्या खात्यावर जमा होत असलेले पैसे त्यांच्या खात्यावर जमा होऊ नये यासाठी काँग्रेसच्या पदाधिकार्यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून आपला विकृत चेहरा समोर आणलेला आहे. मुळात भाजपा सरकारने ही लोकाभिमुख योजना सुरू केली. तेव्हापासून या योजनेला कायम खोडा घालण्याचे काम काँग्रेस पक्षाच्यावतीने सुरू केलेले आहे. यासाठी त्यांनी या योजनेच्या विरोधात याचिकाही न्यायालयात दाखल केली होती. आता परत मकरसंक्रातीच्या शुभ मुहूर्तावर लाडक्या बहिणीच्या खात्यात दोन महिण्याचे तीन हजार रूपये राज्य सरकारच्यावतीने जमा करण्यात येणार आहे. खर्या अर्थाने लाडक्या बहिणीच्या सक्षमणीकरणासाठी राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कटिबध्द आहे. हे वास्तव असतानाही हा लाडक्या बहिणीचा आनंद काँग्रेस पक्षाला पहावत नाही. त्यामुळे सदैव लाडक्या बहिणीच्या विरोधात काम करणार्या काँग्रेसच्या सत्ताधार्यांना लातूर महानगरपलिकेतील निवडणुकीमध्ये पायउतार करावे. असे आवाहनही भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...
स्पिनिंग या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं.
हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे.

## २ Joke विनोद




राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले ?
राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## ३ Message संदेश




Tourist = Ye kiska kankaal hai..? Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha....

## ४ Thought सुविचार

शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.- कार्लाइल



**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा: साात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# समाचार महाशब्दकोड्यांचा



## आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

## उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणुसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

## आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

## उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व



# बडोद्यात भारताचा न्यूझीलंडविरुद्ध 'विराट' विजय



## रोहित शर्माचा षटकारांचा विक्रम

**रोहित शर्माने बडोद्यात न्यूझीलंड विरूद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात २९ चेंडूत तीन चौकार आणि दोन षटकार मारत २६ धावा केल्या. तो जेमीसनच्या चेंडूवर मायकेल ब्रेसवेलकडे झेल देऊन परतला. पण बाद होण्याआधी त्याने नवा विक्रम केला. रोहितने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६५० षटकारांचा टप्पा पूर्ण केला. ही कामगिरी करणारा तो जगातील पहिला फलंदाज आहे.**



बडोदा : भारताने न्यूझीलंड विरूद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना जिंकत विजयी सलामी दिली. बडोद्यात झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात नाणेफेक जिंकून भारताने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंडले ५० षटकांत आठ बाद ३०० धावा केल्या. धावांचा पाठलाग करणाऱ्या भारताने ४९ षटकांत सहा बाद ३०६ धावा केल्या. भारतीय संघाने बडोद्याचा सामना चार विकेट आणि एक षटक राखून जिंकला. या सामन्यात भारताकडून सर्वाधिक ९३ धावा करणारा विराट कोहली सामनावीर झाला.

भारताकडून रोहित शर्माने २६, शुभमन गिलने ५६, कोहलीने ९३, श्रेयस अय्यरने ४९, रवींद्र जडेजाने ४, केएल राहुलने नाबाद २९, हर्षित राणाने २९, वॉशिंग्टन सुंदरने नाबाद ७ धावा केल्या. न्यूझीलंडच्या काइल जेमीसनने चार तर क्रिस्टियन क्लार्क आणि आदित्य अशोकने प्रत्येकी एक विकेट घेतली. याआधी न्यूझीलंडची फलंदाजी झाली. किवींकडून डेव्हॉन कॉनवेने ५६, हेन्री निकोल्सने ६२, विल यंगने १२, डॅरिल मिशेलने ८४, ग्लेन फिलिप्सने १२, मिशेल हेने १८, मायकेल ब्रेसवेलने (धावचीत) १६, झकरी फौल्क्सने १, क्रिस्टियन क्लार्कने नाबाद २४ आणि काइल जेमीसनने नाबाद ८ धावा केल्या. टीम इंडियाकडून मोहम्मद सिराज, हर्षित राणा, प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी दोन तर कुलदीप यादवने एक विकेट घेतली.

विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये उभारला धावांचा डोंगर

### दुसरा एकदिवसीय सामना राजकोटमध्ये रंगणार

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना १४ जानेवारीच्या बुधवारी राजकोट येथे होणार आहे. हा सामना जिंकून मालिका जिंकण्याची संधी भारताकडे आहे.**

विराट कोहलीने बडोद्यात न्यूझीलंड विरूद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ९१ चेंडूत आठ चौकार आणि एक षटकार मारत ९३ धावा केल्या. तो जेमीसनच्या चेंडूवर मायकेल ब्रेसवेलकडे झेल देऊन परतला. पण बाद होण्याआधी कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेगाने २८ हजार धावांचा टप्पा पार केला. त्याने सर्वाधिक वेगाने २८ हजार धावांचा टप्पा पार करणाऱ्या सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडीत काढला.

सचिनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण ३४ हजार ३५७ धावा केल्या आहेत तर विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८ हजार ०१७ धावा केल्या आहेत. विराट कोहली कसोटी आणि टी ट्वेंटी या आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रकारांतून निवृत्त झाला आहे. पण एकदिवसीय क्रिकेटमध्ये खेळत आहे.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### गिल फक्त नावालाच, खरा कॅप्टन रोहितच, ब्रेकमध्ये प्लान बनवला

दिल्ली-वडोदराच्या मैदानात भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला वनडे सामना रोमांचक स्थितीत पोहोचला आहेत. या सामन्यात शुभमन गिल फक्त नावालाच कॅप्टन असल्याचा दिसला आणि खरी भूमिका रोहित शर्माच बजावताना दिसला आहे. कारण या सामन्यात कुलदीप यादवला विकेटच मिळत नव्हती, पण ड्रिंक्समध्ये रोहित शर्माने त्याच्याशी चर्चा केली होती. या चर्चेनंतर दुसऱ्याच क्षणी कुलदीप यादवने विकेट काढली होती.खरं तर टीम इंडियाचा चायनामॅन सामन्याच्या सुरूवातीपासून विकेटसाठी प्रयत्न करत होता. पण तब्बल ७ ओव्हर गोलंदाजी करून त्याला विकेटच मिळत नव्हती. शेवटी ड्रिंक्स ब्रेक दरम्यान त्याची रोहित शर्माशी बातचित झाली.यामध्ये रोहित शर्मा त्याला गोलंदाजीबाबत त्याला काही सल्ले देताना दिसला.या सल्ल्यानंतर दुसऱ्याच क्षणी कुलदीप यादवने ३४ व्या ओव्हरच्या दुसऱ्याच बॉलवर ग्लेन फिलिप्सला जाळ्यात फासत त्याची विकेट घेतली होती. या विकेटनंतर विराट कोहलीने जबरदस्त सेलीब्रेशन केले होते.त्यामुळे रोहितने जर सल्ला दिला नसता तर कदाचित कुलदीप यादवला विकेट मिळाली नसती. त्यामुळे रोहितने ज्याप्रकारे गोलंदाजांना बोलावून त्यांच्याशी संवाद साधला.



### विराटच्या नाववर सुपर संडे! मधुरंधरांच्चे विक्रम इतिहासजमा

वडोदरा-भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीनं वडोदरा इथं न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या वनडे सामन्यात एक मोठा विक्रम रचला. रोहित शर्मा २६ धावांवर बाद झाल्यानंतर, कोहलीनं २५वी धाव काढताच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८,००० धावा पूर्ण केल्या. हा टप्पा गाठणारा तो जगातील फक्त तिसरा फलंदाज आहे. यापूर्वी, महान फलंदाज सचिन तेंडुलकर आणि श्रीलंकेचा माजी कर्णधार कुमार संगकारानं ही कामगिरी केली होती.

वेगवान २८००० धावा : विराट कोहली आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८,००० धावा पूर्ण करणारा सर्वात जलद फलंदाज बनला आहे. त्यानं सचिन तेंडुलकरचा दीर्घकाळचा विश्वविक्रम मोडला. सचिन तेंडुलकरनं ६४४ डावांमध्ये २८,००० धावा पूर्ण केल्या होत्या, तर कुमार संगकारानं ६६६ डावांमध्ये ही कामगिरी केली होती. विराटनं त्याच्या ६२४व्या डावात हा टप्पा गाठला.२८००० धावा करणारे सर्वात जलद फलंदाज :

विराट कोहली - ६२४ डाव, सचिन तेंडुलकर - ६४४ डाव, कुमार संगकारा - ६६६ डाव

कुमार संगकाराला टाकलं मागे : यानंतर काही काळातच विराट कोहलीनं कुमार संगकाराचा आणखी एक विक्रम मोडला. खरं तर, त्याच्या डावात जलद ४२ धावा करुन तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आणि कुमार संगकाराला मागे टाकलं.

### टीम इंडियामध्ये दोन खेळाडूंचे बऱ्याच काळानंतर पुनरागमन

वडोदरा-भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील पहिला सामना वडोदरा स्टेडियमवर खेळला जात आहे. नाणेफेक जिंकल्यानंतर, टीम इंडियाचा कर्णधार शुभमन गिलनं प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यासाठी टीम इंडियाच्या प्लेइंग इलेव्हनमध्येही महत्त्वपूर्ण बदल झाले, कर्णधार गिल श्रेयस अय्यर आणि मोहम्मद सिराजसह संघात परतले. गेल्या वर्षीच्या अखेरीस दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी हे तिन्ही खेळाडू टीम इंडियाच्या संघाचा भाग नव्हते.

**सर्वांच्या नजरा श्रेयस अय्यर आणि सिराजवर :**

न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी श्रेयस अय्यरचा संघात समावेश करण्यात आला होता, परंतु त्याला त्यापूर्वीच त्याची सामना फिटनेस सिद्ध करावी लागली. यासाठी, अय्यरनं सध्याच्या विजय हजारे ट्रॉफी हंगामात दोन सामने खेळले, जिथं त्यानं आपली फलंदाजीची कौशल्ये देखील दाखवली आणि त्यानंतर, पहिल्या वनडे सामन्यात त्याचा सहभाग निश्चित झाला. याव्यतिरिक्त, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी मोहम्मद सिराजची संघात निवड झाली नव्हती. आता तो परतल्यानंतर, सर्वांच्या नजरा त्याच्या कामगिरीवर असतील.

## न्यूझीलंड विरुद्ध मॅचमध्ये सचिन तेंडुलकरलाही टाकले मागे

दिल्ली-भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची वनडे सीरिज खेळवली जात असून यातील पहिला सामना रविवारी वडोदरा स्टेडियमवर खेळवला जातोय. या सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करून ८ विकेट्स गमावून ३०० धावा केल्या, आणि भारताला विजयासाठी ३०१ धावांचं आव्हान दिलं. हे आव्हान पूर्ण करताना भारताचा दिग्गज क्रिकेटर विराट कोहलीने अर्धशतक ठोकलं. या आकड्यापर्यंत पोहोचताना विराटने सचिन तेंडुलकरचा (एरम्प्ह ऊाहरेकॉर्ड सुद्धा मोडला. विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये वर्ल्ड रेकॉर्ड बनला. त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८००० धावा पूर्ण केल्या. विराटने सर्वात कमी इनिंग खेळत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ही कामगिरी केली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये हा आकडा गाठण्यासाठी घेतलेल्या इनिंगच्या बाबतीत विराटने सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला आहे. विराटने २८ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. विराट कोहलीला या आकड्यापर्यंत पोहोचण्यासाठी फक्त २५ धावांची गरज होती आणि न्यूझीलंड विरुद्ध दमदार फलंदाजी करताना त्याने हा आकडा गाठला. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ही कामगिरी करणारा कोहली जगातील तिसरा क्रिकेटपटू ठरला. त्याच्या आधी सचिन तेंडुलकर आणि श्रीलंकेचा दिग्गज क्रिकेटर कुमार संगकारा यांच्या नावावर हा रेकॉर्ड होता.



विराट कोहलीने हा रेकॉर्ड वडोदरामध्ये न्यूझीलंड विरुद्ध केला. त्याने आपल्या ६२४ धावांच्या इनिंगने २८ हजार आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण केल्या. आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्वात कमी इनिंगमध्ये एवढ्या धाव करणारा विराट हा पहिला फलंदाज ठरलाय. यापूर्वी सचिन तेंडुलकरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६४४ इनिंगमध्ये २८ हजार धावा पूर्ण केल्या होत्या. तर कुमार संगकाराने ६६६ इनिंगमध्ये २८ हजार धावा पूर्ण केल्या. विराटने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ८४ शतक पूर्ण केले : न्यूझीलंड विरुद्ध सीरीजच्या पहिल्या वनडेपूर्वी विराट कोहलीने ५५६ आंतरराष्ट्रीय सामन्यात ६२३ इनिंगमध्ये ५२.५८ च्या सरासरीने २७,९७५ धाव केल्या होत्या. या काळात त्याने ८४ शतकं आणि १४५ अर्धशतकं झळकावली. विराट कोहली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४० वेळा शून्यावर बाद झाला आहे.

विराटने संगकाराला सुद्धा सोडलं मागे : विराट कोहलीने आपल्या टेस्ट करिअरमध्ये १२३ सामन्यात ९२३० धावा आणि टी२० आंतरराष्ट्रीय करिअरमध्ये १२५ सामन्यात ४१८८ धावा केल्या. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत, त्याच्या पुढे फक्त सचिन तेंडुलकर फलंदाज आहे. विराटने ४२ धावा करून त्याने संगकाराचा २८,०१६ धावांचा विक्रम मागे टाकला आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला.

## दोन सिक्सर अन् षटकारांचा बादशाह बनला रोहित शर्मा बनला; केला अजरामर रेकॉर्ड!

वडोदर-टीम इंडियाचा स्टार फलंदाज रोहित शर्माने आणखी एक मोठा टप्पा गाठला आहे. रविवारी (११ जानेवारी) न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या वनडे सामन्यात हिटमॅननं दोन षटकार मारुन इतिहास रचला. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६५० षटकार मारणारा रोहित जगातील पहिला खेळाडू ठरला. त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या खेळाडूंच्या यादीत रोहित शर्मा अव्वल स्थानावर आहे, त्यानंतर वेस्ट इंडिजचा माजी फलंदाज ख्रिस गेल आहे, ज्याने ५५३ षटकार मारले आहेत. म्हणजे हिटमॅन आणि युनिव्हर्स बॉसमधील अंतर ९५ षटकारांचे आहे.

रोहित शर्माने केला विश्वविक्रम : भारतीय संघासाठी रोहित शर्मानं पहिल्या वनडे सामन्यात २६ धावांची खेळी केली, ज्यामध्ये त्यानं दोन षटकार आणि तीन चौकार मारले. काइल जेमिसनच्या चेंडूवर मोठा स्ट्रोक मारण्याचा प्रयत्न करताना तो कीवी कर्णधार मायकेल ब्रेसवेलकडे झेल देत बाद झाला. मात्र सामन्यात दोन षटकार मारुन रोहितनं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६५० षटकार मारले आणि हा विक्रम करणारा जगातील पहिला फलंदाज बनला. त्याच्या आधी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये हा विक्रम कोणीही केला नव्हता.

रोहित वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा सलामीवीर : याव्यतिरिक्त, रोहित शर्मा वनडे क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक षटकार मारणारा सलामीवीर बनला आहे, त्यानं ख्रिस गेलचा विक्रम मोडला आहे. रोहितनं आता वनडे क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून ३२९ षटकार मारले आहेत, तर गेलनं सलामीवीर म्हणून ३२८ षटकार मारले आहेत.रोहितनं कोणत्या स्वरुपात किती षटकार : रोहित शर्मानं वनडे सामन्यात ३५७ षटकार मारले आहेत. २०२५ मध्ये, त्यानं या फॉर्मॅटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा शाहिद आफ्रिदीचा विक्रम मोडला, जो बराच काळ नंबर वन स्थानावर होता. रोहित शर्मा हा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज देखील आहे. त्यानं २०५ षटकारांसह टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २०० षटकार मारणारा तो जगातील एकमेव फलंदाज आहे. रोहितनं कसोटी क्रिकेटमध्येही ८८ षटकार मारले आहेत.



रोहित शर्मानं २००७ मध्ये वनडे क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि सुरुवातीला तो चांगला खेळला नाही. मात्र, महेंद्रसिंग धोनीने त्याला डावाची सुरुवात करण्यासाठी बढती दिली आणि त्यानंतर त्यानं मागे वळून पाहिले नाही. त्याने २८० वनडे सामन्यांमध्ये एकूण ११,५४२ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये ३३ शतके आणि ६१ अर्धशतके आहेत.

## ज्याने देशाला सुवर्ण दिले, तो हिरो काळाच्या पडद्याआड



मुंबई-भारतीय क्रीडा आणि हॉकी विश्वासाठी शनिवारचा दिवस शोकमय ठरला. १९८० च्या मॉस्को ऑलिम्पिकमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या ऐतिहासिक संघातील महत्त्वाचे सदस्य, ऑलिम्पियन दविंदर सिंह गरचा यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने क्रीडा विश्वात, विशेषत: हॉकीप्रेमींमध्ये, तीव्र शोककळा पसरली आहे. सुरजीत हॉकी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी इक्बाल सिंग संधू यांनी दविंदर सिंह गरचा यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, त्यांच्या अंत्यसंस्काराची तारीख व वेळ अद्याप निश्चित झालेली नाही. सोसायटीच्या सर्व सदस्यांनी शोकसंतप्त कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत दिवंगत आत्म्यास शांती लाभावी, अशी प्रार्थना केली आहे. हॉकीला समर्पित आयुष्य ७ डिसेंबर १९५२ रोजी जन्मलेले दविंदर सिंह गरचा हे त्या भारतीय हॉकी संघाचा अविभाज्य भाग होते, ज्यांनी १९८० च्या ऑलिम्पिकमध्ये देशाला सुवर्णपदक मिळवून दिले. या ऐतिहासिक स्पर्धेत त्यांनी सहा सामने खेळत तब्बल आठ गोल नोंदवले आणि भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्यांनी केवळ तीन मोठ्या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असला, तरीही ३० हून अधिक आंतरराष्ट्रीय सामन्यांत १९ गोल करत त्यांनी आपल्या आक्रमक खेळशैलीची आणि गोल करण्याच्या क्षमतेची छाप उमटवली. खेळातून निवृत्तीनंतरही त्यांचे हॉकीशी नाते तुटले नाही.

## टीम इंडियाला फुकटात विकेट मिळाली, श्रेयसच्या चमत्कारीक थ्रोने कॅप्टनचा काटा काढला

दिल्ली-वडोदराच्या मैदानात प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने ३०० धावा ठोकल्या आहेत. त्यामुळे आता टीम इंडियासमोर ३०१ धावांचे आव्हान असणार आहे.या सामन्यात टीम इंडियाने खुप चांगली फिल्डिंग केली होती. विशेष म्हणजे या सामन्यात टीम इंडियाला एक विकेट फुकटात मिळाली. ही विकेट फक्त आणि फक्त श्रेयस अय्यरमुळे शक्य झाली आहे.त्यामुळे श्रेयसने मैदानात नेमकं काय केले? हे जाणून घेऊयात.

खरे तर ही घटना ४२ व्या ओव्हर दरम्यान घडली आहे. ही ओव्हर टाकायला हर्षित राणा आला होता. या ओव्हरच्या पाचव्या बॉलवर डेरी मिचेल लॉंग ऑनच्या दिशेने शॉर्ट खेळला होता.हा बॉल खूपच दूर गेलेला पाहून डेरीने दोन धावा काढण्याचा प्रयत्न केला. पण बाऊन्ड्री लाईनवर उभ्या असलेल्या श्रेयस अय्यरने वायु वेगाने स्टम्पच्या दिशेने थ्रो करत मिचेल ब्रेसवेलला रनआऊट केले.मिचेल ब्रेसवेल आपल्याच धुंदीत धावत बसला आणि रनआऊट झाला. विशेष म्हणजे ही विकेट टीम इंडियाला मिळेल असे कुणाला वाटलं देखील नव्हते. पण टीम इंडियाला फुकटात विकेट मिळाली.




विशेष म्हणजे श्रेयर अय्यरला ऑस्ट्रेलिया दौऱ्यात कॅच घेताना खंबीर दुखापत झाली होती.या दुखापतीतून सावरल्यानंतर त्याचा फिटनेसचा प्रश्न होता. मात्र विजय हजारे स्पर्धेत त्याने वादळी खेळी करून आपली फिटनेस सिद्ध केली होती.त्यानंतर आता त्याने हा रनआऊट घेऊन तो किती फिट आहे,याचा दाखला दिला आहे.

दरम्यान प्रथम फलंदाजी करताना डेवॉन कॉन्वे आणि हेन्री निकोलीसने डावाची चांगली सूरूवात केली होती. दोघांनी मिळून जवळपास ११७ धावांची पार्टनरशीप केली होती. त्यानंतर हर्षित राणाने डेवॉन कॉन्वेला ५६ धावांवर क्लिन बोल्ड केले. तर हेन्री निकोलसला ६२ धावांवर कॅच आऊट केले. त्यानंतर डेरी मिचेलने सर्वाधिक ८४ धावांची खेळी केली आहे. या खेळीमुळेच न्यूझीलंड ३०० धावांचा टप्पा ओलांडू शकली. टीम इंडियाकडून मोहम्मद सिराज, हर्षित राणा आणि प्रसिद्ध कृष्णाने प्रत्येकी २ विकेट घेतले. तर कुलदीप यादवने एक विकेट घेतली.

न्यूझीलंडची प्लेइंग इलेव्हन: डेव्हॉन कॉनवे, हेन्री निकोल्स, विल यंग, डॅरिल मिशेल, ग्लेन फिलिप्स, मिशेल हे (विकेटकिपर), मायकेल ब्रेसवेल (कर्णधार), झाचेरी फॉल्क्स, ख्रिश्चन क्लार्क, काइल जेमिसन आणि आदित्य अशोक. टीम इंडियाची प्लेइंग इलेव्हन : रोहित शर्मा, शुभमन गिल (कर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (विकेटकिपर), रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, हर्षित राणा, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा.

भारत विरूद्ध न्यूझीलंड वनडे मालिका वेळापत्रक

पहिला वनडे सामना : ११ जानेवारी २०२६, वडोदरा, दुपारी १.३० वाजता

दुसरा वनडे सामना : १४ जानेवारी २०२६, राजकोट,दुपारी १.३० वाजता

तिसरा वनडे सामना : १८ जानेवारी २०२६, इंदुर, दुपारी १.३० वाजता

भारत विरूद्ध न्यूझीलंड टी२० मालिकेचे वेळापत्रक

पहिला टी२० सामना : २१ जानेवारी २०२६, नागपूर संध्याकाळी ७.०० वाजता

दुसरा टी२० सामना : २३ जानेवारी २०२६, रायपूर संध्याकाळी ७.०० वाजता

तिसरा टी२० सामना : २५ जानेवारी २०२६, गुवाहाटी, संध्याकाळी ७.०० वाजता

चौथा टी२० सामना : २८ जानेवारी २०२६, विशाखापट्टणम,संध्याकाळी ७.०० वाजता

पाचवा टी२० सामना : ३१ जानेवारी २०२६, तिरूवनंतपुरम, संध्याकाळी ७.०० वाजता

# धर्म, मानवता व स्वातंत्र्याचे प्रतीक श्री गुरु तेगबहादुर साहिब जी !

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिब जी हे धर्म, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे महान गुरु होते. शीख इतिहासातच नव्हे तर संपूर्ण भारतीय इतिहासात त्यांना 'हिंद-दी-चादर' म्हणून सन्मानाने ओळखले जाते.



श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचा जन्म पंजाबमधील अमृतसर येथे वैशाख कृष्ण पंचमी या पवित्र तिथीला झाला. बालपणी त्यांना त्यागमल या नावाने ओळखले जात होते. लहानपणापासूनच ते निर्भय, शूर, विचारशील व उदार स्वभावाचे होते. त्यांचे शिक्षण मीरी-पीरीचे स्वामी, गुरु-पिता श्री गुरु हरगोबिंद साहिबजी यांच्या छत्रछायेत झाले.

अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत परकीय आक्रमणाविरुद्ध लढा देत पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्याने प्रभावीत होऊन गुरु हरगोबिंद साहिबजी यांनी त्यांना 'तेगबहादुर' हे नाव दिले, ज्याचा अर्थ 'तलवारीचा धनी' असा होतो. या काळात त्यांनी गुरुबाणी, धर्मग्रंथांचे अध्ययन तसेच अस्त्र-शस्त्रविद्या व घोडेस्वारीचे शिक्षण आत्मसात केले.

शीख (सिख) धर्माचे आठवे गुरु श्री गुरु हरिकृष्णजी यांची आत्मज्योति विसर्जित झाल्या नंतर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांची नववे गुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी आपल्या गुरुपदाच्या कार्यकाळात संस्कृती रक्षक, सामाजिक समता, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्य यासाठी अखंड प्रयत्न केले.

१७ व्या शतकामध्ये तत्कालिन शासन कर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुध्द आवाज उठवून मानवी हक्कांसाठी बलिदान देवून भारताच्या सांस्कृतिक व आध्यामिक अस्मितेचे त्यांनी रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक दृढ (मजबुत) झाली. त्यांच्या या त्यागामुळेच ते खऱ्या अर्थाने 'हिंद-दी-चादर' ठरले.

गुरु तेगबहादुर साहिब जी यांच्या शिकवणीत क्षमा, करुणा, समता, प्रेम व मानवतेचा संदेश आहे. चुका स्वीकारण्याचे धैर्य असल्यास क्षमा शक्य आहे, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी १५ रागांमध्ये रचलेले ११६ शबद (गुरुबाणी) श्री गुरु ग्रंथसाहिबमध्ये संकलित असून ते आध्यात्मिक प्रेरणेचा अमूल्य ठेवा आहे.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचे सन २०२५ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले योगदान स्मरण होण्यासाठी नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात निशान साहिबांना चोला अर्पण करण्याची सेवा, श्री अखंडपाठ साहिब, कीर्तन, धार्मिक दीवान भरवण्यात येणार आहे. तसेच देशातील नामवंत रागी जत्थ्यांकडून शबद गायन होणार आहे.

त्यांच्या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ यावर्षी ३५० वा शहीदी समागम वर्ष साजरा होत असून त्या निमित्ताने राज्यात तीन ठिकाणी श्री तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. यापुर्वी नागपूर येथे हा कार्यक्रम ७ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात आला. आता दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे मामा चौक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोदी मैदानावर या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नांदेडच्या या कार्यक्रमानंतर नवी मुंबई येथे १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंद-दी-चादर या कार्यक्रमाचे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य आयोजन करण्यात येणार आहे.

या पवित्र प्रसंगी सिख धर्मीय बांधवांसह सर्व धर्मीय भाविक गुरु घरात उपस्थित राहून मत्था टेकणार असून श्रद्धा, भक्ती व ऐक्याचे दर्शन घडणार आहे. धर्म, मानवता व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या या महान गुरूंच्या स्मरणार्थ नांदेड येथे होणारा हा शहीदी समागम समाजाला सत्य, त्याग व साहसाचा संदेश देणारा ठरणार आहे.

**– अलका पाटील**
**उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड**

# 'आयपीपीएआय'च्या राष्ट्रीय परिषदेत महावितरणचा सहा पुरस्कारांनी गौरव

**मुंबई/प्रतिनिधी :** जानेवारी २०२६: इंडिपेन्डंट पॉवर प्रोड्यूसर असोसिएशन ऑफ इंडियाच्या () २६ व्या राष्ट्रीय रेग्युलेटर्स अँण्ड पॉलिसी मेकर्स परिषदेत महावितरणला ऊर्जा क्षेत्रातील अग्रगण्य आयपीपीएआय पॉवर अवॉर्ड्स-२०२६ मध्ये विविध सहा पुरस्कारांनी शनिवारी (दि. १०) गौरविण्यात आले. यात विशेषतः स्मार्ट ग्रिड, रूफटॉप सोलर, बॅटरी स्टोरेज आणि विद्युत वाहन प्रोत्साहन या वर्गवारीमध्ये महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले.




'महावितरणने तंत्रज्ञान आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रात घेतलेली झेप विद्युत क्षेत्रात मोठे बदल घडवून आणत आहे. हे पुरस्कार त्याची पावती आहे', अशी प्रतिक्रिया देत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

इंडिपेन्डंट पॉवर प्रोड्यूसर असोसिएशन ऑफ इंडियाच्या () वतीने बेळगाव (कर्नाटक) येथे दि. ७ ते १० जानेवारीला २६ व्या राष्ट्रीय रेग्युलेटर्स अँण्ड पॉलिसीमेकर्स परिषदेचे आयोजन करण्यात आले. राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने केलेल्या विविध कामगिरीचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला. यात १) स्मार्ट ग्रिड सोल्यूशन्सच्या अंमलबजावणीसाठी सर्वोत्तम उपयुक्तता (विजेता), २) छतावरील सौर ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देणारे सर्वोत्तम राज्य (विजेता), ३) सर्वोत्तम बॅटरी स्टोरेज प्रकल्प (विजेता), ४) ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा साठवणूक तंत्र- आयटी अप्लिकेशन (नवोपक्रम पुरस्कार), ५) इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणारे सर्वोत्तम राज्य (विजेता) आणि ६) ग्रीन हायड्रोजन आणि अमोनिया नियोजनातील सर्वोत्तम राज्य (उपविजेता) या पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

माजी केंद्रीय मंत्री श्री. सुरेश प्रभू, केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. घनशाम प्रसाद, ऑल इंडिया डिस्कॉम असोसिएशनचे महासंचालक व केंद्रीय माजी ऊर्जा सचिव श्री. अलोक कुमार, पॉवर सिस्टम ऑपरेशन कॉर्पोरेशनचे माजी महासंचालक श्री. सुशील कुमार सुनी, महाराष्ट्राचे सेवानिवृत्त मुख्य सचिव श्री. अजोय मेहता यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्याहस्ते महावितरणच्या वतीने मुख्य अभियंता श्री. संदीप पाटील, अधीक्षक अभियंता श्री. अमित कुलकर्णी, श्री. अनिल गेडाम, कार्यकारी अभियंता श्री. संजय गवळी, श्री. संजय गायकवाड, जनसंपर्क अधिकारी श्री. विश्वजीत भोसले, उपकार्यकारी अभियंता श्री. प्रसाद दिवाण, श्री. राजेंद्र सूर्यवंशी, सहाय्यक अभियंता श्री. कपिल जाधव, श्री. पवन देशपांडे यांनी पुरस्कार स्वीकारले.

या परिषदेत वितरण व पारेषण नियोजन, अक्षय ऊर्जेला (सौर व पवन) प्राधान्याने ग्रीडमध्ये सामावून घेताना येणारा ताण व आव्हाने, मागणीचा अंदाज आणि संसाधन पर्याप्तता नियोजन, बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम्स, वीज वितरण कंपन्यांची आर्थिक स्थिती मजबूत करण्याच्या उपाययोजना, उदयोन्मुख तंत्रज्ञान व आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग आदींवर चर्चा करण्यात आली. राज्य विद्युत नियामक आयोगांचे अध्यक्ष, वीज वितरण, पारेषण, निर्मिती व लोड डिस्पॅच सेंटर्सचे वरिष्ठ अधिकारी, अक्षय ऊर्जा, वित्तीय संस्था आदींचे देशभरातील सुमारे ५०० प्रतिनिधी उपस्थित होते.

# महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने दि.१४/०१/२०२६, ते दि.१६/०१/२०२६ रोजी लातूर शहरातील बार्शी रोड वरील वाहतुक मार्गात बदल

**लातूर/प्रतिनिधी :** लातुर शहरात महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने दि.१४/०१/२०२६ रोजी सकाळी ०७.०० ते १५.०० वाजेपर्यंत मतपेटी घेऊन बुथवर जाणे व दि.१५/०१/२०२६ रोजी संध्याकाळी १८.०० ते २४.०० वाजेपर्यंत मतपेटी बुथवरुन आणुन जमा करणे तसेच दि.१६/०१/२०२६ रोजी सकाळी ०७.०० ते मतमोजणी संपेपर्यंत या तिन्ही निवडणुक प्रक्रीया महिला तंत्रनिकेतन, बार्शी रोड, लातूर येथे होणार आहेत. त्यामुळे जनतेच्या सोयीच्या व सुरक्षीततेच्या दृष्टीने लातूर शहरातील खालील मार्गावर वाहतुक बंद करणे व पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे.लोकांच्या दैनंदीन कामकाजानिमीत्त व दळणवळणानिमीत्त त्यांना विविक्षीत ठिकाणी पोहचणे निकडीचे असते, सदरच्या अडचणी लक्षात घेता सदर भागातुन वाहतुक बंद करणे व वाहतुक वळविणे आवश्यक आहे.

दिनांक १४/०१/२०२६ रोजी ०७.०० ते १५.०० वाजेपावेतो, दिनांक १५/०१/२०२६ रोजी १८.०० ते २४.०० वाजेपावेतो व दिनांक १६/०१/२०२६ रोजी ०७.०० ते मतमोजणी संपेपर्यंत मुख्य बार्शी रोडवरील पिव्हीआर चौक ते बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज पर्यंतचा रस्ता हा सर्व प्रकारच्या वाहनांना (मोटार सायकल, थ्री व्हीलर, एस.टी.बसेस, ट्रक, टॅम्पो, टॅक्सी, ट्रॅव्हल्स, मिनीडोअर इ.) वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे.

तरी जनतेने खालील पर्यायी मार्गाचा अवलंब करावा :-

१) पी.व्ही.आर चौकातुन मुरुड-बार्शी कडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना (मोटार सायकल, थ्री व्हीलर, एस.टी.बसेस, ट्रक, टॅम्पो, टॅक्सी, ट्रॅव्हल्स, मिनीडोअर इ.) मुख्य बार्शी रोड वाहतुकीसाठी बंद करण्यात येत असून त्यांना पर्यायी मार्ग म्हणून पी.व्ही.आर.चौकातुन जुने रेल्वे लाईनच्या पॅरलल रोडकडे वळून जुने रेल्वे लाईनच्या पॅरलल रोडने मुरुड-बार्शीकडे जाण्यासाठीच्या मार्गाचा वापर करतील.

२) पी.व्ही.आर चौकातून फक्त मतमोजणी अधिकारी व कर्मचारी यांचीच वाहने मुख्य बार्शी रोडवरुन मा.जिल्हाधिकारी कार्यालय मधील पार्किंग कडे जातील.

३)निवडणुक निर्णय अधिकारी,सहा. निवडणुक निर्णय अधिकारी, मा.जिल्हाधिकारी, मा. पोलीस अधिक्षक व मा.मनपा आयुक्त यांची वाहने महिला तंत्रनिकेतन येथील मतमोजणी ठिकाणी जातील.

४) बार्शी व मुरुड कडून लातूर शहरात येणाया सर्व प्रकारच्या वाहनांना (मोटार सायकल, थ्री व्हीलर, एस.टी.बसेस, ट्रक, टॅम्पो, टॅक्सी, ट्रॅव्हल्स, मिनीडोअर इ.) मुख्य बार्शी रोड वाहतुकीसाठी बंद करण्यात येत असून त्यांना पर्यायी मार्ग म्हणून बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज येथून जुने रेल्वे लाईनच्या पॅरलल रोडकडे वळून पॅरलल रोडने पी.व्ही.आर चौक किंवा औसा कडील रिंग रोडला जाण्यासाठीच्या मार्गाचा वापर करतील. तरी सर्व नागरिकांनी दि.१४/०१/२०२६ रोजी सकाळी ०७.०० ते १५.०० वाजेपर्यंत व दि.१५/०१/२०२६ रोजी संध्याकाळी १८.०० ते २४.०० वाजेपर्यंत तसेच दि.१६/०१/२०२६ रोजी सकाळी ०७.०० ते मतमोजणी संपेपर्यंत वाहतुकीसाठी बंद असलेल्या मार्गावर वाहनांचा वापर टाळावा व पर्यायीमार्गाचा वापर करुन प्रशासनास सहकार्य करावे.

# राजा नारायणलाल लाहोटी सीबीएसई स्कूलमध्ये, मातृत्वाचा आदर्श राजमाता जिजामाता आणि भारताचे आदर्श पुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी!

लातूर: येथील राजा नारायणलाल लाहोटी विद्यालयात राजमाता जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त विशेष परिपाठाचे आयोजन करण्यात आले. स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन म्हणजेच १२ जानेवारी हा दिवस युवा दिन म्हणून सर्वत्र साजरा होतो. शिकागो धर्म परिषदेत अर्थातच विलायतेमध्येसुद्धा भारतीय संस्कृतीची महती गाणारे आणि युवा पिढीतच भारताच्या उन्नतीचे स्वप्न पाहणारे स्वामी विवेकानंद आणि महाराष्ट्राला स्वराज्य मिळवून देणारा राजा घडवणाऱ्या , सुराज्याची नांदी करून अखिल विश्वासाठी मातृत्वाचा आदर्श असणाऱ्या राजमाता जिजाऊ यांची जयंती विद्यालयात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम रजिस्टार प्रवीण प्रवीण शिवनगीकर , विद्यालयाचे माध्यमिक समन्वयक मनोहर कबाडे , प्राथमिक विभाग प्रमुख अरूल सेल्व्ही , सर्व सदनाचे प्रमुख यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले.

इयत्ता पाचवी वर्गातील विशालाक्षी मद्रेवार तसेच इयत्ता चौथी वर्गातील सावनी फडकुले या विद्यार्थिनींनी आपल्या माहितीपर भाषणातून स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या कार्याचे दर्शन घडवले.

या प्रस्तुत प्रसंगी मंजुषा भोसले ,राणी आमले, रेश्मा काळे, वर्षा खुंटेगावे, मनीषा मगर, स्वरांजली देशपांडे, अवनी सेठ ,अश्विनी जयशेट्टी, सीमा जाधव , शिरीष देशपांडे,कृष्णा कुलकर्णी, कौस्तुभ जोशी , आशिद बनसोडे ज्ञानेश्वर यादव अमृत शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील दोन महत्त्वाच्या वीज पारेषण प्रकल्पांचे आरईसीकडून हस्तांतरण

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई: आरईसी पॉवर डेव्हलपमेंट अँड कन्सल्टन्सी लिमिटेड (RECPDCL) या आरईसी लिमिटेडच्या पूर्ण मालकीच्या, ऊर्जा मंत्रालयाच्या अखत्यारीतील 'महारत्न' केंद्रीय सार्वजनिक उपक्रमाने महाराष्ट्रातील दोन महत्त्वाच्या आंतरराज्यांतर्गत (Intra-State) वीज पारेषण प्रकल्पांचे विशेष उद्देश कंपनी (SPV) हस्तांतरण यशस्वीपणे पूर्ण केले आहे. हे हस्तांतरण ९ जानेवारी २०२६ रोजी टॅरिफ-बेस्ड कॉम्पिटिटिव्ह बिडिंग (TBCB) मार्गाने करण्यात आले.

पहिला प्रकल्प वेळगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड हा सीगल इंडिया लिमिटेड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. हा प्रकल्प 'बिल्ड, ओन, ऑपरेट अँड ट्रान्सफर' (BOOT) तत्त्वावर विकसित केला जाणार आहे. ठएउझऊड चे वरिष्ठ महाव्यवस्थापक व ट्रान्समिशन अँड डिस्ट्रिब्युशन विभाग प्रमुख श्री विजय कुलकर्णी यांनी हा ड्झत सीगल इंडिया लिमिटेडचे संचालक डॉ. सुधीर राव होशिंग यांच्याकडे हस्तांतरित केला. यावेळी महाराष्ट्र राज्य पारेषण उपयोजनाचे (STU) मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा आणि डॉ. होशिंग यांच्यात ट्रान्समिशन सर्व्हिस ॲग्रीमेंट (TSA) करण्यात आला. या प्रकल्पाचा अंमलबजावणी कालावधी २४ महिने आहे. या प्रकल्पाअंतर्गत ४००/२२० के. व्ही. वेळगाव गॅस इन्स्युलेटेड उपकेंद्र (GIS) उभारणे, तसेच ४०० के.व्ही. व २२० के.व्ही. दुहेरी व एकेरी सर्किट वाहिन्यांचे लाईन-इन-लाईन-आऊट (लिलो) व संबंधित कामांचा समावेश आहे. महाराष्ट्राच्या महत्त्वाकांक्षी वीज पारेषण विस्तार कार्यक्रमांतर्गत हा पहिला प्रकल्प ठरला आहे, ज्याने हे महत्त्वपूर्ण टप्पे गाठले आहेत.

त्याच दिवशी RECPDCL कडून जेजुरी-हिंजवडी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड हा दुसरा SPV टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आला. हा प्रकल्पही इजजढ तत्त्वावर विकसित केला जाणार आहे. श्री विजय कुलकर्णी यांनी हा SPV टाटा पॉवर कंपनीचे बिझनेस डेव्हलपमेंट – ट्रान्समिशन अँड डिस्ट्रिब्युशन (आंतरराष्ट्रीय) विभागप्रमुख श्री पियुष कुमार यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी महाराष्ट्र STU चे मुख्य अभियंता श्री पीयूष शर्मा आणि श्री पियुष कुमार यांच्यात TSA करण्यात आला. या प्रकल्पाचा अंमलबजावणी कालावधी देखील २४ महिने आहे. या योजनेत जेजुरी (विद्यमान) ते हिंजवडी दरम्यान सुमारे ११५ किमी लांबीची ४०० केव्ही दुहेरी सर्किट वीज वाहिनी उभारण्याचा समावेश आहे. प्रत्येकी २,००० मेगावॅट क्षमतेची ४०० केव्ही क्वॉड दुहेरी सर्किट वाहिनी पुणे-हिंजवडी परिसरातील डेटा सेंटर्ससह औद्योगिक व निवासी भागांना



विश्र्वासार्ह वीजपुरवठा सुनिश्र्चित करणार असून पुणे रिंग मेन नेटवर्कची स्थिरता व विश्वासार्हता लक्षणीयरीत्या वाढवणार आहे.

महाराष्ट्र राज्य पारेषण उपयोजन, राज्य शासनाच्या अखत्यारीत तसेच अतिरिक्त मुख्य सचिव सौ. अभा शुक्ला (आयएएस) आणि महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (आयएएस) यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याच्या ऊर्जा संक्रमण आराखड्यानुसार महत्त्वाकांक्षी वीज पारेषण विस्तार कार्यक्रम राबवत आहे. वितरण कंपन्यांच्या संसाधन पर्याप्तता आराखड्याशी सुसंगत अशी पारेषण व्यवस्था निर्माण करणे आणि राज्याची वीज पारेषण पायाभूत रचना अधिक बळकट करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

# नोडल अधिकारी तथा उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी रो.सदस्यांना मतदानाची शपथ दिली

**लातूर/प्रतिनिधी :** रोटरी इंटरनॅशनलच्या मूल्यांवर आधारित फोर वे टेस्ट प्रमोशन चा उद्‌घाटन सोहळा प्रांतपाल मा. श्री. रो. सुधीरजी लातुरे यांच्या शुभ हस्ते हॉटेल अंम्बेसी मध्ये सायंकाळी सात वाजता रोटरी चे अध्यक्ष रो. जकीखान कायमखानी व सचिव रो. विश्वनाथ निगुडगे यांनी आयोजित केला होता.




सदरील कार्यक्रमात मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांचा जागरूक व सक्रीय सहभाग वाढावा, यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या स्वीप कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मतदान प्रक्रियेविषयी जनजागृती करणे, मतदान प्रक्रियेचे सखोल ज्ञान प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवणे तसेच मतदारांचा सहभाग वाढवून लोकशाहीला खऱ्या अर्थाने लोकसहभागात्मक बनविणे हा आहे. याच अनुषंगाने लातूर महानगरपालिका निवडणुक २०२६ च्या निमित्ताने शहरभर शाळा व महाविद्यालय व विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून मतदान जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून नोडल अधिकारी तथा दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी रोटरीच्या फोर वे टेस्ट प्रमोशन च्या उद्घाटन समारंभ प्रसंगात उपस्थित असलेल्या सर्व रोटरीच्या सदस्यांना मतदानाची शपथ दिली.

या कार्यक्रमासाठी सहाय्यक प्रांतपाल मा. श्री. रो. रविशंकर हिंगणे,रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ लातूर एस्पीरेशन अध्यक्ष रो. कौशल्या सोनकवडे,सचिव,रो. वनिता लाचुरिया,रो. प्रोजेक्ट चेयरमेन डॉ.आसिफ शेख रो. श्री होळीकर, रो डॉ संदिपान जगदाळे व शहरातील सर्व माननीय रोटरीयन उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०१

# पोदारमधील कला प्रदर्शनास विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



धाराशिव (प्रतिनिधी)-पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव येथे विद्यार्थ्यांच्या कलाकृतीला वाव मिळावा तसेच त्यांच्या अंगी असलेले वैचारिक दृष्टिकोन बाहेर पडावेत यासाठी स्कूलचे प्राचार्य डॉ.वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कला प्रदर्शनाचे (आर्ट एक्झिबिशन) चे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डीआरडीएस सोलापूर येथील श्री धर्मेश टंक सर, तसेच श्रीमती सौम्याश्री पूजा मॅडम, श्री शिवकुमार स्वामी सर प्रादेशिक कला सुविधा लातूर हब, आदी मान्यवर उपस्थित होते. त्याचबरोबर स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर, उपप्राचार्य निलेश जाधव सर, व्यवस्थापकीय श्री जीवन कुलकर्णी सर, उप व्यवस्थापकीय अधिकारी श्री प्रदीप शिंदे सर, वरिष्ठ समन्वयक श्री प्रभाकर चौधरी सर हे देखील उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते रिबन कापून करण्यात आली. या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता प्रत्येकाने आपापल्या कलेचे प्रदर्शन करून त्याचे सादरीकरण अतिशय देखण्या स्वरूपात केले. या कार्यक्रमाला पालक वर्ग देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन कार्यक्रमाधिकारी दीपक अंकुश सर यांनी केले.

# ३१ डिसेंबरपर्यंत गाळपास आलेल्या ऊसाचे बिल २०० रुपयेप्रमाणे १२ जानेवारी रोजी जमा करणार: चेअरमन नानासाहेब पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- तालुक्यातील जागजी शिवारातील एनव्हीपी शुगर प्रा.लि या कारखान्यास २०२५- २६ च्या गळीत हंगामात ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत गाळपास आलेल्या ऊसाचे बिल २५०० रुपयेप्रमाणे यापूर्वी जमा करण्यात आले आहे. यासोबत पुढील बिलाचा हप्ता २०० रुपयेप्रमाणे सोमवार दि.१२ जानेवारी २०२६ रोजी बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली आहे.

त्याचबरोबर दि.१ जानेवारी २०२६ पासून २७०० प्रमाणे ऊस बिल संबंधित शेतकर्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे. याबाबत कारखान्यामार्फत परिपत्रक जारी करण्यात आले आहे. यात म्हटले आहे की, कारखान्याकडे गळीत हंगाम २०२५-२६ साठी कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकरी बांधवाना, तोडणी वाहतुक ठेकेदाराचा करार केलेल्या संबधित ठेकेदारांना, शेतकी विभागातील कर्मचार्यानी या गळीत हंगामातील शेतकर्यांना दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ऊसास पहिला हप्ता म्हणून २५००/- प्रमाणे प्रत्येक पंधरवाडा संपल्यावर संबधित शेतकर्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेला आहे. संक्रात सणानिमित्ताने २०० /- प्रमाणे वार सोमवार दि. १२ जानेवारी २०२६ रोजी संबंधित शेतकर्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहेत.

तसेच चालू गळीत हंगामामध्ये दि. ०१ जानेवारी २०२६ पासून २७००/- प्रमाणे ऊस बिल देण्यात येणार आहे. शेतकर्यांना योग्य ऊसभाव देण्याची परंपरा एनव्हीपी शुगर परिवार कायम ठेवणार आहे. याची सर्व कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी वाहतुक ठेकेदार व शेतकी विभातातील कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

तसेच जास्तीत जास्त शेतकर्यांनी कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी केले आहे.

# मोहेकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उत्साहात उद्घाटन




कळंब (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन डीकसळ या गावी उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत गाडगे महाराज व मोहेकर गुरुजींच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. पाणलोट व पडीक जमिनीचा चिरंतन विकास या विषय केंद्रित शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती डॉ.मनीषा कळसकर, जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना धाराशिव विभाग यांनी केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना त्या म्हणाल्या, राष्ट्रीय विकास व निर्माण यामध्ये विद्यार्थी विद्यार्थिनी ची भूमिका अतिशय महत्त्वाचे आहे. आजचे विद्यार्थी हे राष्ट्र विकासाचे स्तंभ आहेत. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती रुजली पाहिजे. त्यापुढे म्हणाल्या, राष्ट्रीय विकास व निर्माण मध्ये पर्यावरणाची भूमिका अतिशय महत्त्वाचे आहे. समाज व पर्यावरण यांचा समतोल साधून राष्ट्रीय विकास व निर्माण करता येईल असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अशोकराव मोहेकर साहेब , सचिव ज्ञान प्रसारक मंडळ हे लाभले. ते म्हणाले विद्यार्थ्यांनी मोबाईल केंद्रित न राहता पुस्तक केंद्रीत राहावे. आजचा विद्यार्थी मोबाईलच्या स्क्रीन मध्ये अडकला असून त्यांनी वेळेत यामधून बाहेर पडले पाहिजे व व्यक्तिमत्त्वाचा विकास केला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान सर यांनी अध्यक्षीय समारोप केला. ते म्हणाले विद्यार्थ्यांनी आत्मकेंद्री न बनता ज्ञानकेंद्री बनावे. राष्ट्रीय सेवा योजना च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास करून समाजाचा विकास करता येईल असे ते म्हणाले. पर्यावरण समाज आणि विद्यार्थी या त्रिवेणी संगमातून समृद्ध देशाची प्रगती करता येईल असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. ताटीपामुल सर यांनी केले व आभार प्रा. अंकुशराव सर यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. वर्षा सरवदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी ,डॉ. दत्ता साकोळे, डॉ. दादाराव गुंडरे, डॉ. दीपक सूर्यवंशी, डॉ. नामानंद साठे,डॉ. संदीप महाजन, डॉ. मीनाक्षी जाधव, श्रीमती अर्चना मुखेडकर,डॉ. जयवंत ढोले, डॉ. संजय सावंत, डॉ. चंदनशिव, डॉ. वाघमारे, प्रा.शिंपले, प्रा. दळवी, प्रा. जमले ,प्रा. तांबोळी,प्रा. शिंदे,प्रा. रोहिणी लोकरे,प्रा. पालके, प्रा. संदीप देवकते सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के डी जाधव सर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ . हेमंत चांदोरे, उपप्राचार्य जयंत भोसले, प्रा. विलास अडसूळ चे विशेष सहकार्य लाभले. तसेच व महाविद्यालयाचे अधीक्षक हनुमंत जाधव,सहाय्यक ग्रंथपाल अरविंद शिंदे श्री बंडगर व अर्जुन वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

# जीवनदान महाकुंभ अंतर्गत कळंब येथे रक्तदान शिबिर; ८३ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

कळंब (प्रतिनिधी ): जगद्गुरु श्री रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज (दक्षिण पीठ, नाणीज धाम, महाराष्ट्र) यांच्या प्रेरणेने राज्यभर राबविण्यात येणाऱ्या जीवनदान महाकुंभ (रक्तदान) २०२६ उपक्रमांतर्गत कळंब येथे रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. दिनांक ४ते १८ जानेवारी या कालावधीत सुरू असलेल्या या महाअभियानाचा मुख्य उद्देश गरजू रुग्णांसाठी विनामूल्य, सुरक्षित व पुरेसे रक्त उपलब्ध करून देणे हा आहे.

उपजिल्हा रुग्णालय, कळंब येथे ७ जानेवारी रोजी आयोजित या शिबिरात ८३ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे भान ठेवले. तुम्ही जगा, दुसऱ्याला जगवा हा जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराजांचा संदेश या माध्यमातून प्रत्यक्ष कृतीत उतरल्याचे चित्र दिसून आले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक अमर चाऊस, डिकसळ ग्रामपंचायत सदस्य इम्रान मुल्ला, विकास कदम, सतीश आडसूळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

रक्तसंकलनाचे कार्य धाराशिव शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या ब्लड बँकेच्या वतीने करण्यात आले. डॉ. दीपमाला करंडे (रक्तसंक्रमण अधिकारी), लक्ष्मीकांत मुंडे (रक्तपेढी तंत्रज्ञ) यांच्यासह ब्लड बँक व उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी यांनी शिस्तबद्ध, सुरक्षित व नियमानुसार रक्तसंकलन प्रक्रिया पार पाडली. रक्तदान करणाऱ्या दात्यांना रक्तदान प्रमाणपत्रांचे वितरण ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, प्राचार्य जगदीश गवळी, माधवसिंग राजपूत, जयनारायण दरक यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराजांचे शिष्यगण, सेवाभावी कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी गरजवंत भक्तांना ब्लँकेट वाटप, तसेच रक्तदात्यांना बिस्किटांचे वितरण जयनारायण दरक यांच्या वतीने करण्यात आले. राज्यभर सुरू असलेल्या जीवनदान महाकुंभ २०२६ उपक्रमाला समाजातील विविध स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून या माध्यमातून आरोग्य सेवेस मोठा हातभार लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराजांचे शिष्यगण विठ्ठल काटे, कल्याण बोराडे, जीवन चव्हाण, राजेंद्र मुळीक, दत्तात्रय इंगोले, स्वप्नील खिंडकर, रमेश शिंदे, प्रदीप जाधव, प्रमोद कुलकर्णी, अशोक त्रिमुखे, अनिता चव्हाण, अनिता विभुते, सुहासिनी काळे, कोमल जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **CHAVAN ASHOK SUBAHS** TO: **ASHOK SUBHASH CHAVAN**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **ASHOK SUBHASH CHAVAN** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **CHAVAN ASHOK SUBAHS**
NEW NAME :- **ASHOK SUBHASH CHAVAN**
Address - IndraNagar Hagarga Bal Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-949607503846 Mob.9850340555

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

**जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धाराशिव** (उपचिटणीस शाखा)
मेन रोड, धाराशिव पिनकोड - ४१३५०१ दुरध्वनी क्र. ०२४७२-२२७३०१
Email Id-rdc1osmanabad@gmail.com

जा.क्र २०२५/उपचिटणीस/एमएजी-४/कावि-२४२९/ सिआर-४७ दिनांक :- निम्नस्वाक्षरीत

**जाहिर प्रगटन**
**(विस्फोटक नियम २००८ चे नियम १०७)**

सर्व नागरिक मौजे बावी ता.वाशी जि. धाराशिव यांना या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे, बावी ता. वाशी जि. धाराशिव येथील जमीन गट नंबर **१०९९** मध्ये **श्री. दयानंद गौतम धावारे** रा. बावी ता. वाशी यांनी शोभेची दारू कब्जात ठेवून विक्री (फटाका विक्री) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २४ विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-५ मिळणेसाठी अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. प्रस्तावित जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

**१. पूर्व बाजू - संगीता मधुकर शिंदे यांची जमीन**
**२. पश्चिम बाजू - वामन निवृत्ती धावारे**
**३. दक्षिण बाजू - शिवराम शंकर धावारे यांची जमीन**
**४. उत्तर बाजू - श्रीमंत जालिंदर शिंदे यांची जमीन**

सदर परवानगीबाबत स्थानिक चौकशीबाबत मा.पोलीस अधीक्षक, धाराशिव/कार्यकारी अभियंता म.रा.वि.वितरण कंपनी, धाराशिव/कार्यकारी दंडाधिकारी, वाशी/कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जि.प.धाराशिव, यांचेमार्फत झालेली आहे.

तरी, **श्री. दयानंद गौतम धावारे रा. बावी** ता. वाशी यांना मौजे. बावी ता. वाशी येथील जमीन गट नंबर १०९९ मध्ये शोभेची दारू कब्जात ठेवून (फटका विक्री) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २४ विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-५ ची परवानगी देणेबाबत कोणास **कांही आक्षेप असल्यास, सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले** पासून **(०८)** दिवसाचे आत समक्ष हजर राहून या कार्यालयास लेखी सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झालेस पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

Signed by
Vidyacharan Jagannath Kadavkar
Date:08-01-2026 11:00:16

स्वाक्षरित/-
**(विद्याचरण कडवकर)**
**अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव.**

**जिमाका/एके/जाहि/११८**

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SHAIKH ASHA BI GOUS MOHAMMED** TO: **MEHAJABIN GOUSAHAMAD SHAIKH**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **MEHAJABIN GOUSAHAMAD SHAIKH** in future the same will used by my family husband /wife, children and ED relative.
OLD NAME :- **SHAIKH ASHA BI GOUS MOHAMMED**
NEW NAME :- **MEHAJABIN GOUSAHAMAD SHAIKH**
Address - At Post Boramani Taluka Solapur South DIST.Solapur. -413002
Adhar n.-968381584635 Mob.8208324441

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SHAIKH GOUS MOHAMMED HAJI SAIFANSAB**
TO: **GOUS AHAMAD SAIFAN SHAIKH**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **GOUSAHAMAD SAIFAN SHAIKH** future the same will used by my family husband /wife, children and ED relative.
OLD NAME :- **SHAIKH GOUS MOHAMMED HAJI SAFAINSAB**
NEW NAME :- **GOUS AHAMAD SAIFAN SHAIKH**
Address - 128 Masjid Javal At Post Boramani Taluka Solapur South DIST.Solapur. -413002
Adhar n.-327421918355 Mob.8208324441

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649